RNI. REG. NO. MAHBIL/2023/86118
लोकरक्षणाय
LOKRAKSHANAY
सह संपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ

■www.lokrakshanay.com ■epaper.lokrakshanay.com ■dainiklokrakshanay@gmail.com ■@dainiklokrakshanay ■+91 97023 86118

लोकशाहीच्या संरक्षणार्थ

# लोकरक्षणाय

■वर्ष ०४ ■अंक १५१ ■ठाणे ■सोमवार, दि. ३१ ऑगस्ट २०२६ ■पृष्ठे ८ ■मूल्य २ रूपये

भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व...



पान ५ वर

# गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानातील कामांना नव्या ‘टाइमलाईन’ने गती द्या – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

● विदर्भातील महत्त्वाचे पर्यटन केंद्र म्हणून गोरेवाड्याचा विकास व्हावा
● आफ्रिकन सफारीच्या कामाचाही घेतला आढावा; सल्लागार नियुक्त करण्याचे निर्देश

● नागपूर, नितीन देवळेकर :

हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाचा नियोजनबद्ध आणि सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गोरेवाडा प्रकल्पाची पाहणी करून विविध कामांचा सविस्तर आढावा घेतला. आफ्रिकन सफारी सुरू करण्यासाठी सुरू असलेल्या कामांची सद्यस्थिती, प्रकल्पाची प्रगती आणि सफारी सुरू करण्याचे अपेक्षित वेळापत्रक याबाबत त्यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती जाणून घेतली. गोरेवाड्यात







सुरू असलेल्या सर्व कामांसाठी नव्याने स्पष्ट कालमर्यादा निश्चित करून त्यानुसार कामांना गती देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

गोरेवाडा येथील वन्यजीव संशोधन व प्रशिक्षण केंद्रातील वसंतराव नाईक प्रशासकीय इमारतीत आज आयोजित आढावा बैठकीला वनमंत्री गणेश नाईक, खासदार माया इनवाते, वनविभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, प्रधान मुख्य वन संरक्षक(वनबल प्रमुख) एम. श्रीनिवास राव, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी, पोलीस अधीक्षक ग्रामीण हर्ष पोद्दार, वाईल्डलाइफ रेस्क्यू व ट्रेनिंग सेंटरचे संचालक शिरीष उपाध्ये, अपर जिल्हाधिकारी प्रवीण महिरे, विभागीय व्यवस्थापक तथा प्राणीसंग्रहालय संचालक पांडुरंग पाखले यांच्यासह वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी गोरेवाडा प्रकल्पातील विविध कामांची माहिती घेताना संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा केली. आफ्रिकन सफारी हा गोरेवाडा प्रकल्पाच्या दृष्टीने महत्त्वाचा भाग असून, त्यासाठी आवश्यक असलेल्या पायाभूत सुविधा आणि अन्य कामांची पूर्तता कोणत्या टप्प्यावर आहे, याची माहिती त्यांनी जाणून घेतली. ● पान २ वर

# बालकांच्या संविधानिक हक्कांवरील ‘कलरिंग बुक’चे मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते लोकार्पण

● मुंबई, विशाल कारंडे :

न्याय संस्था आणि विधी सेंटर फॉर लीगल पॉलिसी यांच्यावतीने बालकांना त्यांच्या संविधानिक हक्कांची माहिती सहज, आनंददायी पद्धतीने मिळावी, यासाठी ‘प्रत्येक बालकाने जाणून घ्यावेत असे १८ मूलभूत हक्क’ हे बुक तयार करण्यात आले आहे. या कलरिंग बुकचे लोकार्पण महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते नुकतेच करण्यात आले.नॅशनल सेंटर फॉर परफॉर्मिंग



आर्ट्स (एनसीपीए), मुंबई येथे आयोजित कार्यक्रमास मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती भारती डंगरे, माजी न्यायमूर्ती आर. सी. चव्हाण, अनिशा गोपी यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी संस्थेच्या वतीने राज्यात संविधान फेलोशिपचाही शुभारंभ करण्यात आला.बालकांच्या हक्कांची माहिती त्यांना लहान वयापासूनच व्हावी, या उद्देशाने तयार करण्यात आलेले हे कलरिंग बुक मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. या बुकमध्ये निवारा, पोषण, शिक्षण आणि मोफत कायदेशीर मदत यांसह बालकांच्या १८ महत्त्वपूर्ण हक्कांची माहिती देण्यात आली आहे. तसेच बालविवाह, बालमजुरी, रॅगिंग, बुलिंग आणि लैंगिक शोषण या विषयांचाही बालकांना समजेल अशा संवेदनशील पद्धतीने समावेश करण्यात आला आहे. मंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की, बालकांच्या हक्कांचे संरक्षण करण्यासाठी शासन सदैव कटिबद्ध आहे. या प्रयत्नांना कल्पकतेतून बळ देणाऱ्या या कलरिंग बुकच्या माध्यमातून बालकांना त्यांच्या हक्कांची माहिती सहज आणि आनंददायी पद्धतीने मिळणार आहे.

रंग भरताना बालकांच्या मनावर त्यांच्या हक्कांची जाणीव रुजण्यास मदत होणार असल्याचा आनंद आहे. तसेच संविधान फेलोशिपच्या माध्यमातून कायदे आणि संविधानाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी संस्थेने घेतलेला पुढाकार महत्त्वपूर्ण आहे.

# रत्नागिरीत २,१५९ कोटींची ऐतिहासिक गुंतवणूक

## पंचतारांकित हॉटेलसाठी १०० कोटी

● रत्नागिरी, दिगंबर जाधव :

कोकणात उद्योग येत नाहीत हा जुना ठपका पुसून काढत रत्नागिरीच्या स्थानिक उद्योजकांनी औद्योगिक आणि पर्यटन विकासाला नवी गती दिली आहे. ‘जिल्हा गुंतवणूक परिषद २०२६’च्या माध्यमातून जिल्ह्यात तब्बल २ हजार १५९ कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे सामंजस्य करार करण्यात आले. यामध्ये रत्नागिरीच्या पर्यटन




वैभवात भर घालणाऱ्या १०० कोटींच्या पंचतारांकित हॉटेल प्रकल्पासह मोठ्या औद्योगिक प्रकल्पांचा समावेश आहे.


**एक्सप्रेस ग्रुप उभारणार पंचतारांकित हॉटेल; जयगडमधील हॉटेलही सज्ज**

● पान २ वर

# मोदींना उझबेकिस्तानचा सर्वोच्च ‘मैत्री’ पुरस्कार

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

उझबेकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष शौकत मिर्झियोयेव्ह यांनी रविवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आपल्या देशाचा सर्वोच्च सन्मान 'ओली दराजली दोस्तलिक' (सर्वोच्च दर्जाचा मैत्रीचा सन्मान/Order of Friendship of the Highest Degree) प्रदान केला. जगभरातून पंतप्रधान मोदींना मिळालेल्या सर्वोच्च सन्मानांच्या वाढत्या यादीतील ही एक नवीन भर आहे. पंतप्रधान मोदींना आतापर्यंत 30 हून अधिक प्रतिष्ठित आंतरराष्ट्रीय सन्मान मिळाले आहेत, ज्यामुळे ते इतिहासातील सर्वाधिक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळवणारे



भारतीय नेते ठरले आहेत.

या सन्मानांमध्ये जगभरातील विविध राष्ट्रे आणि संस्थांनी दिलेले शासकीय सन्मान, शैक्षणिक पुरस्कार आणि पर्यावरणविषयक सन्मानांचा समावेश आहे. या वर्षाच्या सुरुवातीला जुलैमध्ये इंडोनेशियाचे राष्ट्राध्यक्ष प्राबोवो सुबियांतो यांनीही पंतप्रधान मोदींना आपल्या देशाचा सर्वोच्च सन्मान 'बिंतांग आदिपूर्णा' (Bintang Adipurna) प्रदान केला होता. तत्पूर्वी पंतप्रधान मोदींनी ताश्कंदमध्ये राष्ट्राध्यक्ष शौकत मिर्झियोयेव्ह यांच्याशी शिष्टमंडळ स्तरावरील चर्चा केली. या बैठकीला परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (NSA) अजित डोवाल, ● पान २ वर

# झोपडपट्टी विकासाला आता सुविधांची जोड

● नागपूर, प्रथमेश चव्हाण :

झोपडपट्टीतील रहिवाशांना मोठ्या प्रमाणात मालकी हक्काचे पट्टे देणारे नागपूर हे देशातील एकमेव शहर आहे. मात्र आम्ही फक्त मालकी हक्काचे पट्टे देऊन थांबणार नाही, तर या वसाहतींमध्ये मूलभूत सुविधा देऊन तेथील रहिवाशांचे जीवनमान उंचावण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.नागपूर शहरातील झोपडपट्टीधारकांना हक्काचे मालकी पट्टे मिळवून देऊन त्यांना सन्मानाने जगता यावे म्हणून मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी केलेले प्रयत्न आणि त्याअनुषंगाने झालेले निर्णय या



संपूर्ण प्रक्रियेवर सीएफएसडी (सेंटर फॉर सस्टेनेबल डेव्हलपमेंट) च्या लीना बुद्धे यांनी लिहिलेल्या ‘फूट प्रिंट ऑफ डिग्निटी’ या पुस्तकाचे प्रकाशन आज सकाळी ‘रामगिरी’ येथे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले, त्यावेळी ते बोलत होते.

झोपडपट्टीतील रहिवाशांना मालकीपट्टे मिळणे अतिशय आवश्यक होते. ते दिल्यामुळे त्यांचे जीवन बदलल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, त्यांचा सर्वसमावेशक विकास होण्याच्या दृष्टीने आम्ही प्रयत्न करीत आहोत. झोपडपट्टी विकासासाठी हे पुस्तक दिशादर्शक असणार आहे. मी नागपूरचा महापौर असतानाच या प्रश्नाचे गांभीर्य लक्षात आले होते. त्यामुळे पुढे आमदार म्हणूनही हा विषय लावून धरला. या क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून काम करणाऱ्या या पुस्तकाच्या लेखिका लीना बुद्धे यांनीही हा गुंतागुंतीचा विषय अभ्यासपूर्ण मांडला. ● पान २ वर

# डिजिटल अरेस्टच्या जाळ्यात मॅनेजर

## ९० लाखांची सायबर फसवणूक

● नाशिक, प्रतिनिधी :

नाशिकमध्ये सायबर फसवणुकीची एक अत्यंत धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. मुंबई दहशतवाद विरोधी पथकाचे नाव सांगून सायबर गुन्हेगारांनी एका नामांकित वाहन निर्मिती कंपनीच्या मॅनेजरला 'डिजिटल अरेस्ट'ची भीती दाखवत तब्बल ८९ लाख ९९ हजार रुपयांचा गंडा घातला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या चौकशीच्या नावाखाली ही अवाढव्य फसवणूक करण्यात आल्याने नाशिकमध्ये मोठी खळबळ उडाली आहे.



अहवालानुसार, संबंधित गुन्हेगारांनी स्वतःला मुंबई एटीएसचे अधिकारी असल्याचे भासवून मॅनेजरशी संपर्क साधला आणि त्यांना गंभीर परिणामांची भीती दाखवून धमकावले. आंतरराष्ट्रीय दहशतवादी आणि मनी लॉँड्रिंग प्रकरणात तुमचे नाव आले असल्याचे सांगून आरोपींनी मॅनेजरला आपल्या जाळ्यात ओढले. आरोपींनी मॅनेजरचे आधार कार्ड वापरून दहशतवादी आदिल गौरी याने जम्मूमध्ये बनावट बँक खाते उघडल्याची खोटी भीती घातली.या भीतीपोटी भामट्यांनी मॅनेजरला १७ ऑगस्ट ते २८ ऑगस्ट या दिवसांच्या कालावधीत त्यांच्या स्वतःच्या घरातच 'डिजिटल अरेस्ट' करून ठेवले. त्यानंतर आरबीआय चौकशीची भीती दाखवून आणि कायदेशीर कारवाईपासून वाचवण्याचे प्रलोभन देऊन विविध बँक खात्यांमध्ये पैसे जमा करण्यास भाग पाडले. सायबर गुन्हेगारांच्या सांगण्यावरून मॅनेजरने तब्बल ८९ लाख ९९ हजार रुपये वेगवेगळ्या बँक खात्यांवर ट्रान्सफर केले. पैसे जमा होताच आरोपींनी ती रक्कम इतर विविध खात्यांमध्ये वळवली आणि मॅनेजरची फसवणूक केली. हा फसवणुकीचा प्रकार लक्षात आल्यानंतर पीडित मॅनेजरने तात्काळ पोलिसांत धाव घेतली. सध्या या गंभीर प्रकरणाचा अधिक तपास वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुशील कोल्हे यांच्या मार्गदर्शनाखाली वेगाने सुरू आहे. नागरिक आणि कर्मचाऱ्यांनी अशा कोणत्याही अनोळखी कॉल किंवा डिजिटल अरेस्टच्या धमक्यांना न घाबरता तात्काळ पोलिसांशी संपर्क साधावा, असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे.

# ३ हजार कोटींनी वाढला जलजीवन मिशनचा खर्च

● मुंबई, सचिन कदम :

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून सुरू झालेल्या जलजीवन मिशनचा राज्यातील खर्च वाढत चालला आहे. एकीकडे अपूर्ण कामांवरून कॅगने ताशेरे ओढले असतानाच या योजनेचा खर्च तीन हजार कोटींनी वाढला आहे. चुकलेले नियोजन, सर्वेक्षणातील त्रुटी, अंमलबजावणीतील विलंब आणि योजनेतील बदलामुळे



या योजनेचा एकीकडे खर्च दुप्पटीहून अधिक वाढला आहे. विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात सादर झालेल्या कॅगच्या अहवालात जलजीवन मिशनचा खर्च दुप्पट झाला पण तरीही कामे अपूर्ण असल्याचे ठपका ठेवला आहे. तर दुसरीकडे तीन जिल्ह्यातील तेरा योजनांचा खर्च तीन हजार कोटी रुपयांनी वाढला आहे.

जलजीवन योजनेतील चुकीचा आराखडा केल्यामुळे खर्च वाढल्याची कबुली मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी विधिमंडळाच्या अधिवेशनात दिली होती. नेमकी हीच कारणे या तेरा प्रस्तावांना सुधारित प्रशासकीय मान्यता देताना नमूद केली आहेत. तांत्रिक बदल आणि वस्तू व सेवा कराच्या दरात (जीएसटी) वाढ झाल्याने सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यात येत असल्याचे प्रस्तावात नमूद केले आहे. राज्याच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने सुधारित प्रशासकीय मान्यतेच्या तेरा प्रस्तावांना एका फटक्यात मान्यता दिली आहे.

संभाजीनगरमधील मौजे बाजार सांगवीमधील जलवीजन मिशन कार्यक्रमातील नळपाणी योजनेच्या ४६ कोटी ६ लाख रुपयांच्या मूळ खर्चाला सुरवातीला मान्यता देण्यात आली होती.

पण तांत्रिक बदलामुळे या योजनेचा खर्च १२५ कोटी ७५ लाख रुपयांवर गेला आहे तर संभाजीनगरमधील खुल्ताबादमधील मौजे झरीमधील जलजीवन योजनेचा मूळ खर्च ८६ लाख ९४ लाख रुपयांचा होता. पण तांत्रिक बदल व जीएसटी करातील वाढीमुळे हा खर्च १८४ कोटी ७ लाख रुपयांवर गेला. ● पान २ वर

# मराठवाडा बनतोय नवा 'सिल्क हब'

मराठवाड्यातील शेती आता नव्या दिशेने वाटचाल करत आहे. पारंपरिक पिकांबरोबरच तुतीची लागवड आणि रेशीम कोष उत्पादनाकडे शेतकऱ्यांचा वाढता कल दिसून येत आहे. विशेषतः बीड, जालना आणि धाराशिव या जिल्ह्यांतील शेतकरी या क्षेत्रात आघाडीवर आहेत. अलीकडेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते जालन्यात राज्यातील पहिल्या रेशीम बाजारपेठ इमारतीचे उद्घाटन झाल्याने या व्यवसायाला नवी ऊर्जा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

व्यापार आणि उद्योगाचे महत्त्वाचे केंद्र म्हणून ओळख असलेल्या जालन्याला पूर्वी 'जालना सोने का पालना' अशी उपमा दिली जात होती. ऐतिहासिक वारसा लाभलेल्या या शहराने काळानुसार विविध उद्योगांमध्ये स्वतःचे वेगळे स्थान निर्माण केले आहे. १९६० नंतर महिकोसारख्या कंपन्यांमुळे जालना बियाणे उद्योगाचे केंद्र बनले, तर गेल्या काही वर्षांत येथील तरुण उद्योजकांनी स्टील उद्योगातही आपली छाप पाडली आहे.

याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी जालन्यातील रेशीम बाजारपेठेचे उद्घाटन करताना स्टील आणि सीड उद्योगासोबत आता सिल्कमुळेही जालन्याची नवी ओळख निर्माण होत असल्याचे सांगितले. 'तीन एस'च्या बळावर शहराची स्वतंत्र ओळख तयार होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच 'जालनाई' या नव्या रेशीम ब्रँडची घोषणाही यावेळी करण्यात आली.

ऊस, सोयाबीन आणि कापूस ही नगदी पिके असली तरी त्यांच्या बाजारभावातील अनिश्चिततेचा फटका शेतकऱ्यांना वारंवार बसतो. त्यामुळे स्थिर उत्पन्नाचा पर्याय म्हणून रेशीम शेतीकडे अनेकांनी पावले वळवली आहेत. सुरुवातीला प्रयोग म्हणून सुरू झालेली ही शेती आता वेगाने विस्तारत असून तुती लागवड आणि रेशीम कोष उत्पादनात सातत्याने वाढ होत आहे.

गतवर्षी मराठवाड्यातील आठही जिल्ह्यांत मिळून ३,१३४.९४३ टन रेशीम कोषाचे उत्पादन झाले. या व्यवसायाशी ११ हजारांहून अधिक शेतकरी जोडले गेले असून, ११ हजार ८८३ हेक्टर क्षेत्रावर तुतीची लागवड करण्यात आली आहे. कोष उत्पादनात बीड जिल्हा अव्वल असून, त्यानंतर धाराशिव आणि जालना यांचा क्रमांक लागतो.

राज्यातील एकूण रेशीम उत्पादनात मराठवाड्याचा वाटा आता तब्बल ५७ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे कृषी विभागाचे म्हणणे आहे. कमी पाण्यात होणारे उत्पादन, अल्प कालावधीत मिळणारे पीक आणि चांगल्या उत्पन्नाची संधी या तीन प्रमुख कारणांमुळे शेतकरी या व्यवसायाकडे आकर्षित होत आहेत.

याशिवाय प्रतिएकर दीड ते दोन लाख रुपयांपर्यंत मिळणारे उत्पन्न, वर्षभरात तीन ते चार वेळा पीक घेण्याची क्षमता, शासनाकडून मिळणारे अनुदान आणि मनरेगा योजनेत तुती लागवडीचा समावेश यामुळेही रेशीम शेतीला मोठे प्रोत्साहन मिळत आहे.

जालन्याचे आमदार अर्जुन खोतकर यांच्याकडे यापूर्वी मंत्रिमंडळात रेशीम उद्योगाची जबाबदारी होती. बाजार समितीचे अध्यक्ष झाल्यानंतर शेतकऱ्यांना रेशीम कोष विक्रीसाठी इतर ठिकाणी जावे लागत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. त्यानंतर जालन्यातच आधुनिक रेशीम कोष बाजारपेठ उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. सुमारे सहा कोटी रुपयांच्या खर्चातून उभारलेल्या या इमारतीत शेतकऱ्यांसाठी विविध सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत.रेशीम व्यापाराच्या दृष्टीने बीडची बाजारपेठही आता देशभरात ओळख निर्माण करत आहे. कर्नाटकातील रामनगरनंतर देशातील महत्त्वाच्या रेशीम बाजारपेठांमध्ये बीडचा उल्लेख केला जातो. महाराष्ट्रातील विविध भागांबरोबरच इतर राज्यांतील शेतकरीही कोष विक्रीसाठी बीडकडे येत आहेत. चांगले बाजारभाव, उपलब्ध सुविधा आणि व्यवहाराची रक्कम तातडीने मिळण्याची व्यवस्था यामुळे ही बाजारपेठ अधिक विश्वासार्ह ठरत आहे.

संभाजीनगर, परभणी आणि हिंगोली येथेही रेशीम बाजारपेठांचा विस्तार सुरू आहे. मात्र, केवळ कोष खरेदीपुरते मर्यादित न राहता त्यावर प्रक्रिया करून रेशीम धागा तयार करणारे उद्योगही मोठ्या प्रमाणावर उभे राहणे आवश्यक आहे.

ही गरज ओळखून बीडसारख्या ठिकाणी रेशीम धागा निर्मितीचे प्रकल्प सुरू झाले आहेत. गारपीट, अतिवृष्टी आणि दुष्काळ अशा नैसर्गिक संकटांचा सामना करणाऱ्या मराठवाड्यातील शेतकऱ्यांसाठी रेशीम शेती हा उत्पन्नाचा विश्वासार्ह पर्याय ठरत आहे.

जालन्यातील कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी रेशीम उत्पादनापासून धागा, कापड निर्मिती आणि निर्यातीपर्यंतची संपूर्ण मूल्यसाखळी उभारण्याचे आश्वासन दिले. जालन्यात तयार होणाऱ्या रेशीम धाग्याच्या माध्यमातून जागतिक बाजारपेठेशी नवे संबंध प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

भारताचा रेशीम निर्यातीतील ऐतिहासिक वारसाही त्यांनी अधोरेखित केला. सातवाहन काळात पैठण येथून रेशीम आणि जरीची वस्त्रे ग्रीक व रोमन साम्राज्यांपर्यंत पोहोचत होती. धाराशिव जिल्ह्यातील तेर हे गावही तलम सुती आणि रेशीम वस्त्रनिर्मितीसाठी प्रसिद्ध होते. तेथील वस्त्रांना रोमन राजघराण्यासह उच्चभ्रू समाजात मोठी मागणी होती.

qaआज आधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने हा गौरवशाली वारसा पुन्हा नव्याने उभा राहताना दिसत आहे. मराठवाडा 'सिल्क हब' बनण्याच्या दिशेने वेगाने पुढे जात आहे. या परिवर्तनासाठी शासन, कृषी विभाग आणि शेतकरी एकत्रितपणे करत असलेले प्रयत्न निश्चितच स्वागतार्ह आणि आशादायी आहेत.

- अनिकेत घनश्याम भंकाळ

संपादकीय

# स्वप्नवत गणेशगुळे




चित्रकाराने कोकणातल्या एखाद्या स्वप्नवत गावाचं चित्र काढावं आणि त्यात सगळे रंग भरावेत, असंच काहीसं गणेशगुळ्याचं रूप आहे. पावसात चिंब भिजलेली हिरवाई, शांत समुद्र आणि प्राचीन मंदिरं या गावाची सफर खास बनवतात.

एखाद्या चित्रकाराने गावाची कल्पना करावी आणि चित्र चितारावं असं हे रत्नागिरीतील गाव. पावसपासून अगदी काहीच किमी अंतरावर हे स्वप्नवत गाव दडलंय. मुख्य रस्ता सोडला आणि आंब्यांच्या बागांतून जाणारी छोटीशी घाटी उतरली की, आपण पोहोचतो गणेशगुळे या निसर्गरम्य गावात. मी या गावात तीन चारदा जाऊन आली आहे, पण या गावातला पावसाळा माझ्या अगदी आठवणीत राहिलाय.

या गावात माझा मुक्काम आंब्यांच्या झाडांच्या सान्निध्यात असणाऱ्या आणि मागल्या दाराने थेट समुद्र दिसणाऱ्या एका नितांत सुंदर कौलारू व्हिलामध्ये होता. १०० वर्षांहून जास्त जुनं हे घर आहे. घराचं जुनं सौंदर्य जपून, घराची डागडुजी आणि सुंदर सजावट करून पर्यटकांसाठी राहण्याची उत्तम सोय तिथे केली आहे. तिथे मला सकाळी जाग यायची कौलांवर पडणाऱ्या पावसाच्या पाण्याच्या आवाजाने. बाहेर येऊन पाहिल्यावर गाव पावसात चिंब भिजताना दिसायचं, समुद्राची गाज कानात गुंजत राहायची. गावाला कुशीत घेणाऱ्या हिरव्यागार टेकड्या पाहून मन अगदी प्रफुल्लित व्हायचं. छत्री घेऊन गावातून फेरफटका मारून यायचा बेत ठरला होता. पण आधी पोटभर नाश्ता केला. नाश्त्याला घावणे-चटणी आणि गरमगरम चहा होता, सोबत बागेतली फळं होती.

नाश्ता होईपर्यंत पावसाची सर येऊन गेली होती. गावातल्या त्या ओल्याचिंब झालेल्या वाटेवर पावलं पडू लागली. सारा आसमंत अगदी हिरवागार आणि ताजातवाना झाला होता. वाटेत भातशेतीचे कुणगे दिसले. तिथली भात लावणी नुकतीच पार पडली होती. भातशेतीच्या बाजूने जांभ्याची एक वाट आत गेलेली दिसली. कुतुहलाने तिकडे गेले आणि पाहते तर झरा अगदी झुळझुळ करत वाहत होता. झऱ्याचं पाणी पिऊ शकतो इतका तो स्वच्छ होता. शेतामागे काही अंतरावर असलेल्या टेकडीवरून याचं पाणी वाहत येत होतं आणि साऱ्या भातशेतीला संजीवनी देत होतं. तिथे कुणाची गजबज नव्हती की गोंगाट नव्हता. झऱ्याची झुळझुळ कानात साठवली. झऱ्याच्या बाजूलाच एक छोटी बावडी (विहीर) होती. त्यात डोकावून पाहिलं तर अगदी निळंशार पाणी दिसत होतं. सकाळची सुरुवात अगदी सुंदर झाली.

त्यानंतर आम्ही गाडीने इथली मंदिरे पाहायची ठरवलं. पहिल्यांदा आम्ही गावातील गणपती बाप्पाच्या मंदिरात गेलो. एका उंच टेकडीवजा सड्यावर हे मंदिर आहे. पायऱ्या उतरून गेल्यावर मंदिराचं प्रशस्त प्रांगण दिसलं. मंदिरात प्रवेश केल्यावर गणपती बाप्पाची कातळात निर्माण झालेली एक सुंदर स्वयंभू मूर्ती दिसली. बाप्पाचं मनोभावे दर्शन घेतलं. या मंदिरात उभं राहिलं की, आंब्याच्या बागांची अप्रतिम दृश्य दिसतात. मंदिरातून बाहेर आल्यावर अगदी समोरच कातळात खोदलेली आणि बाराही महिने पाणी असणारी एक बारव आहे. त्यात उतरण्यासाठी पायऱ्या आहेत. पावसाळ्यात पायऱ्या गुळगुळीत, निसरड्या असल्याने, त्यात उतरणं मी टाळलं. पण कातळ खोदून केलेली ही बारव पाहताना मी थक्क झाले होते. हे गणेशगुळ्यातील प्रसिद्ध मंदिर पाहून तिथून जवळच असणाऱ्या दुसऱ्या मंदिराकडे गेले.

दुसरं मंदिर बघितलं ते आदित्यनाथ मंदिर.. चारी बाजूने भातशेती आणि त्यात हे टुमदार कौलारू मंदिर आहे.. मंदिरात जाण्यासाठी भातशेतीच्या बांधावरून गेले. त्यावेळी भात लावणी जोरदार सुरू होती. एका बाजूला बैलाचं जोत लावून चिखलणी सुरू होती तर जिथे चिखलणी झाली होती तिथे भात लावणी सुरू होती. गोंगाट नाही, मशीनचा आवाज नाही. केवळ चिखल घुसळून निघण्याचा आवाज आणि तरवे लावतानाची बायकांच्या बांगड्यांची किणकिण ऐकू येत होती. भातशेती पार करून मंदिराच्या आवारात प्रवेश केला. तिथे मला दोन मंदिरं दिसली. दोन्हीही मंदिरं कोकणी धाटणीची. कौलारू. अत्यंत देखणी. एका मंदिरात शिवशंकर विराजमान होते, तर दुसऱ्या मंदिरात आदित्यनाथ. मंदिराच्या प्रांगणात असणाऱ्या विहिरी मात्र जमिनीला सलग असणाऱ्या. बिलकुल उंच नाहीत. थेट जमिनीतच खोदलेल्या होत्या. इथे फिरताना सावकाश लक्ष देऊन फिरावं लागतं.

त्यानंतर तिसरं मंदिर पाहिलं. ते टेकडीच्या कुशीत आणि आंब्याच्या झाडांच्या सान्निध्यात होतं. हे मंदिर आहे लक्ष्मी नारायणाचं. जवळपास ५०० वर्षं जुनं हे मंदिर असावं असा कयास आहे. हे मंदिरही कौलारू. आतील सभामंडप लाकडी खांबाचा आणि त्यावर सुबक अशी काष्ठशिल्प असणारा. गाभाऱ्यात लक्ष्मी नारायणाची काळ्या पाषाणातील मूर्ती विराजमान आहे. मंदिराच्या प्रांगणात मारुतीची आणि गरुडाची मूर्ती आहे. दीपमाळ आहे. इथल्या आवारातही जमिनीला समांतर अशीच विहीर आहे. या विहिरी खरंच विलक्षण आहेत. आजुबाजूला असणाऱ्या घनदाट अशा जंगलात आणि आंब्याच्या बागेत हळद्या, धनेश असे पक्षी मुक्तपणे बागडताना दिसतात.

सकाळची गावातील मंदिरं, आजुबाजूचा निसर्ग पाहत केलेली भटकंती अविस्मरणीय होती. संध्याकाळी तिथला समुद्रकिनारा आणि किनाऱ्या बाजूच्या टेकड्या बघायच्या ठरवलं. गणेशगुळ्याचा समुद्रकिनारा अगदी लांबलचक असा आहे. त्याच्या एका बाजूला असणाऱ्या टेकडीवर ट्रेक करत गेले. करवंदाच्या जाळीतून, झाडीझुडपातून जाणारी पायवाट तुडवत एका पॉइंटला पोहोचले. तिथून समुद्राचा क्षितिजापर्यंत पसरलेला विस्तार अगदी डोळे भरून पाहिला. पावसाळा असल्याने समुद्र अगदी उधाणलेला. खालच्या खडकावर लाटा फुटून आमच्यापर्यंत त्याचे तुषार उडत होते. वाराही सुटलेला. इतक्या वाऱ्यात समुद्र गरुड समुद्रावर विहरताना दिसला. त्याच्या पंखातल्या बळाची कल्पना करून मी अचंबित झाले.

टेकडी उतरून खाली आल्यावर राहत असलेल्या स्टे काढून एक उत्तम सोय केली होती. घराच्या समोर असणाऱ्या वाळूवर टेबल ठेवून हाय टी ची मांडणी केली होती. समोर सूर्य अस्ताला जात होता. काळे ढग बाजूला होऊन केशरी गुलाबी प्रकाश समुद्रावर आकाशात पसरला होता. खुर्चीत निवांत बसून, अशी दृश्य पाहत आणि समुद्राची गाज ऐकत चहा घेणं एक विलक्षण अनुभव होता.

रत्नागिरीचा प्लॅन करत असाल तर समुद्रकिनारा लाभलेलं, मंदिराने संपन्न आणि निसर्गसमृद्ध गणेशगुळे गावही नक्की प्लॅनमध्ये समाविष्ट करा. तिथे बरेच होमस्टे सुरू झाले आहेत. अगदी बजेटफ्रेंडली ते अगदी प्रीमियम असे स्टे तिथे उपलब्ध आहेत. पण कोकणात भटकंती करत असाल तर एकदा तरी या गावाला नक्की जाऊन याच.जवळचे रेल्वे स्थानक, बस स्थानक हे रत्नागिरी आहे. पावसपासून गणेशगुळे जवळ आहे.

**मुक्ता नार्वेकर**
**ट्रॅव्हल व्लॉगर**

## पान १ वरुन

### गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानातील...

आफ्रिकन सफारी सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली कामे निश्चित करून त्यांची पूर्तता कालबद्ध पद्धतीने करण्यावर भर देण्याचे निर्देश त्यांनी दिले.

वनविभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांनी गोरेवाडा प्रकल्पाची आतापर्यंतची वाटचाल, प्रकल्पाची सद्यस्थिती आणि सुरू असलेल्या विविध कामांची माहिती सादरीकरणाद्वारे दिली. सादरीकरणात देण्यात आलेल्या माहितीनुसार, गोरेवाडा प्रकल्पाचा पहिला टप्पा २०२१ मध्ये पूर्ण करण्यात आला आहे. या टप्प्यात वाइल्डलाइफ रेस्क्यू सेंटर, इंडियन सफारी आणि एंट्रन्स प्लाझा यांचा समावेश आहे.

पहिल्या टप्प्यातील ही कामे पूर्ण झाल्यानंतर गोरेवाडा प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी दुसऱ्या आणि तिसऱ्या टप्प्यातील विविध सुविधांचे नियोजन करण्यात आले आहे. आफ्रिकन सफारीसह महत्त्वाची कामे प्रकल्पाच्या दुसऱ्या टप्प्यात समाविष्ट आहेत. वॉकिंग ट्रेल, आफ्रिकन सफारी, सफारी प्लाझा, ॲनिमल हॉस्पिटल आणि क्वारंटाईन ब्लॉक यांचा समावेश असल्याची माहिती सादरीकरणाद्वारे देण्यात आली. यातील आफ्रिकन सफारीच्या कामाच्या प्रगतीबाबत मुख्यमंत्री फडणवीस यांनी विशेष माहिती जाणून घेतली. सफारी सुरू करण्यासाठी आवश्यक असलेली कामे, त्यांची सद्यस्थिती आणि पुढील नियोजन यांचा त्यांनी आढावा घेतला. आफ्रिकन सफारी कधी सुरू करता येईल, याबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांकडून माहिती घेत या कामाला गती देण्याचे निर्देश दिले.

प्रकल्पाच्या तिसऱ्या टप्प्यात ट्रेल ऑफ सेन्सेस, बायोपार्क, नाईट झू, गोंडवाना पार्क, बायो डिस्कव्हरी प्लाझा आणि ट्रायबल ट्रेल यांचा समावेश असल्याची माहिती सादरीकरणात देण्यात आली. या विविध सुविधांच्या माध्यमातून गोरेवाडा प्रकल्पाचा वन्यजीव पर्यटनासोबतच जैवविविधता, निसर्ग आणि स्थानिक संस्कृतीचा अनुभव देणारे महत्त्वाचे पर्यटनस्थळ म्हणून विकास करण्याची संकल्पना मांडण्यात आली.

प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी अनुभवी आणि सक्षम सल्लागाराची नियुक्ती करावी, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिले. गोरेवाड्याचा विकास करताना दीर्घकालीन पर्यटनाच्या गरजा लक्षात घेऊन नियोजन करण्याची आवश्यकता त्यांनी व्यक्त केली.

ताडोबा आणि पेंच येथे येणाऱ्या पर्यटकांनी गोरेवाड्यात एक ते दोन दिवस पर्यटनासाठी घालवावेत, या दृष्टीने गोरेवाड्याचा विकास करण्याची गरज मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केली. ताडोबा आणि गोरेवाडा या दोन्ही पर्यटनस्थळांना जोडणारे प्रभावी नियोजन करून पर्यटकांचा मुक्काम वाढेल, अशा पद्धतीने सुविधा विकसित करण्याची सूचना त्यांनी केली.

गोरेवाडा प्रकल्पात वन्यजीव पर्यटनासोबत पर्यटकांना विविध अनुभव देणाऱ्या सुविधा विकसित करून विदर्भातील महत्त्वाचे पर्यटन केंद्र म्हणून गोरेवाड्याची ओळख निर्माण करण्यासाठी नियोजन करावे, असेही त्यांनी सांगितले.

**गोरेवाडा प्राणी उद्यानाची मुख्यमंत्र्यांकडून पाहणी**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हिंदूहृदयसम्राट स्व. बाळासाहेब ठाकरे गोरेवाडा आंतरराष्ट्रीय प्राणी उद्यानाची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी प्रकल्पातील विविध सुविधांची आणि सुरू असलेल्या कामांची माहिती त्यांनी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून जाणून घेतली. प्रकल्पाच्या पुढील विकासासाठी आवश्यक असलेल्या उपाययोजनांबाबतही त्यांनी अधिकाऱ्यांशी चर्चा केली.

### रत्नागिरीत २,१५९ कोटींची...

जिल्ह्यातील पर्यटन आणि आदरातिथ्य क्षेत्राला बळ देण्यासाठी महत्त्वाच्या घोषणा करण्यात आल्या.

एक्सप्रेस ग्रुपची १०० कोटींची गुंतवणूक : विमानतळापासून २ किलोमीटर, शहरापासून ३ किलोमीटर आणि समुद्रापासून अवघ्या १ किलोमीटर अंतरावर एमआयडीसीच्या जागेत एक्सप्रेस ग्रुप पंचतारांकित हॉटेल उभारणार आहे.

जयगड येथे महिंद्रांचे फाईव्ह स्टार हॉटेल : जयगड येथे उभारण्यात येत असलेल्या आनंद महिंद्रा यांच्या पंचतारांकित हॉटेलचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून ते लवकरच उद्घाटनासाठी सज्ज होत आहे.

विमानसेवा लवकरच सुरू : रत्नागिरी विमानतळाचे ९० टक्के काम पूर्ण झाले असून डिसेंबर ते जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत 'एटीआर' प्रवासी विमान उड्डाण घेईल.

**स्थानिक उद्योजकांच्या बळावर औद्योगिक क्रांती**

कार्यक्रमात बोलताना उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत म्हणाले, "रत्नागिरीचा जीडीपी गेल्या २० वर्षांच्या तुलनेत कित्येक पटीने वाढला असून, यात स्थानिक उद्योजक, व्यापारी आणि दुकानदारांचा मोठा वाटा आहे. स्थानिक उद्योजकांनी पुढाकार घेत २ हजार १५९ कोटींची गुंतवणूक केली आहे. हे सर्व प्रकल्प १०० टक्के पूर्ण करून पुढील वर्षी ५ हजार कोटींच्या गुंतवणुकीचा नवा संकल्प आपण पूर्ण करू."

**स्टील, सेमीकंडक्टर आणि नव्या एमआयडीसींना गती**

स्टील उद्योग : येत्या ७, ८ आणि ९ तारखेला जिल्ह्यात स्टील उद्योगाचा मार्ग मोकळा होत असून, यामुळे किमान १० ते १२ हजार स्थानिकांना रोजगार मिळेल.

सेमीकंडक्टर प्रकल्प : 'व्हीआयटी'कडून जमीन काढून ती 'आरआरपी' या सेमीकंडक्टर कंपनीला दिली जात आहे.

प्रदूषणमुक्त एमआयडीसी : निवेंडी, वाटद आणि मेर्वी येथे नव्या प्रदूषणविरहित एमआयडीसी उभारल्या जात आहेत.

**'मिलाप' ॲप आणि 'मैत्री' पोर्टलद्वारे पारदर्शक सेवा**

उद्योगांसाठी एमआयडीसीची जागा मिळवण्यासाठी 'मिलाप' ॲप सुरू करण्यात आले असून सोमवारी वैध अर्ज केल्यास पुढच्या सोमवारी घरबसल्या थेट ऑफर लेटर मिळेल. तसेच 'मैत्री' पोर्टलवर अर्ज केल्यास ३० दिवसांत दाखला मिळणे बंधनकारक असून, उशीर झाल्यास अधिकार आयुक्तांकडे जाऊन पुढील ८ दिवसांत मंजुरी दिली जाते.

**'नोकरी मागणारे नको, देणारे बना'**

तरुणांनी 'मुख्यमंत्री रोजगार निर्मिती योजना' आणि केंद्राच्या 'विश्वकर्मा योजने'चा लाभ घेऊन स्टार्टअप्स उभारावेत आणि नोकरी मागणारे न राहता नोकरी देणारे बनावे, असे आवाहन उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत यांनी केले.

**राज्यस्तरावरील गुंतवणूक**

आज, दि. ३० ऑगस्ट २०२६ पर्यंत महाराष्ट्रातील १७ जिल्ह्यांत १ हजार ८३७ गुंतवणूक करारांद्वारे ८२ हजार ६५५ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली असून, याद्वारे १ लाख ५५ हजार ३८९ जणांना रोजगार उपलब्ध होणार आहे. आगामी कालावधीत उर्वरित जिल्ह्यांमध्ये जिल्हा गुंतवणूक करार परिषदांचे आयोजन प्रस्तावित आहे. त्याद्वारे राज्यात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक होऊन युवक व युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत.

**रत्नागिरी जिल्हा**

रत्नागिरी जिल्हा गुंतवणूक परिषदेत एकूण ६२ उद्योग घटकांशी २ हजार १५९.३७ कोटी रुपयांचे सामंजस्य करार (एमओयू) करण्यात आले. या गुंतवणुकीतून एकूण २ हजार ४२६ रोजगारांची निर्मिती होणार आहे.

### मोदींना उझबेकिस्तानचा सर्वोच्च...

परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव (पश्चिम) सिबी जॉर्ज आणि इतर अधिकारी उपस्थित होते. चर्चेपूर्वी ताश्कंदमध्ये पंतप्रधान मोदींचे औपचारिक आणि भव्य स्वागत करण्यात आले. राष्ट्राध्यक्ष मिर्झियोयेव्ह यांनी स्वतः पंतप्रधान मोदींचे स्वागत केले आणि दोन्ही नेत्यांनी एकमेकांना उबदारपणे अभिवादन केले.

मध्य आशियाई देशाच्या या दौऱ्यादरम्यान पंतप्रधान मोदींनी उझबेकिस्तानमधील ५२ योगसाधकांनी सादर केलेल्या विशेष योग सत्राचाही अनुभव घेतला. या सत्राची झलक आपल्या 'एक्स' (ट्विटर) खात्यावर शेअर करताना त्यांनी लिहिले, "नमस्कार, आज तुम्ही सर्वांनी उत्कृष्टपणे योगासने केली. येथे सर्व वयोगटातील लोक उपस्थित आहेत. उझबेकिस्तानला योगाशी जोडल्याबद्दल मी माझे मित्र, राष्ट्राध्यक्ष यांचे आभार मानतो. खूप खूप अभिनंदन."

या सत्रामुळे पंतप्रधान मोदींच्या दौऱ्याला एक अनोखा सांस्कृतिक पैलू प्राप्त झाला आणि उझबेकिस्तानमध्ये योगाची वाढती लोकप्रियता अधोरेखित झाली. सहभागींमध्ये 'योग फेडरेशन ऑफ उझबेकिस्तान'च्या सहा सदस्यांचा समावेश होता, ज्यांनी या वर्षी जूनमध्ये अहमदाबाद येथे झालेल्या पहिल्या 'वर्ल्ड योगासन चॅम्पियनशिप'मध्ये आपल्या देशाचे प्रतिनिधित्व केले होते. पंतप्रधान मोदी दोन दिवसांच्या दौऱ्यासाठी शनिवारी उझबेकिस्तानला पोहोचले होते. मध्य आशियाई देशाच्या आपल्या अधिकृत दौऱ्याची सुरुवात करताना, ताश्कंद विमानतळावर मिळालेल्या उबदार स्वागताबद्दल त्यांनी उझबेकिस्तानच्या राष्ट्राध्यक्षांचे आभार मानले.

### झोपडपट्टी विकासाला आता सुविधांची...

मुख्यमंत्री झाल्यानंतर मालकी पट्टे देण्याचा मी निर्णय घेतला. अनेक खासगी जागांवरही झोपडपट्ट्या वसल्या आहेत. त्यांच्या नियमितीकरणासाठीही शासनाने निर्णय घेतला. या संपूर्ण प्रक्रियेचे या पुस्तकामुळे दस्तावेजीकरण झाले आहे असे सांगत मुख्यमंत्र्यांनी लेखिका श्रीमती बुद्धे यांचे अभिनंदन केले.

नागपुरातील झोपडपट्टीधारकांना मालकी हक्काचे पट्टे मिळाले याचे संपूर्ण श्रेय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे असल्याची भावना लेखिका लीना बुद्धे यांनी मनोगतात व्यक्त केली. झोपडपट्टीधारकांचा प्रश्न हा अतिशय जुना आहे. तो फार कोणी समजून घेतला नाही, मात्र मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी त्यासाठी मदतीचा हात पुढे करून ठोस निर्णय घेतले. त्यामुळे मालकी हक्क मिळण्याचा मोठा आनंद त्या रहिवाशांना मिळू शकला. हा सारा प्रवास या पुस्तकात मांडला आहे. नागपूर शहरात १२ ते १५ हजार अशा मालकीपट्ट्यांचे वाटप करण्यात आले आहे. हे खूप मोठे कार्य असल्याचे लीना बुद्धे यावेळी म्हणाल्या. याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर, डॉ. सुहास बुद्धे, सीएफएसडीतील डॉ. बुद्धे यांचे सहकारी आणि त्यांचे आप्त उपस्थित होते.

### ३ हजार कोटींनी वाढला...

संभाजीनगर खुल्ताबादमधील बोखडमध्ये ३२ कोटी ८५ लाख रुपयांच्या मूळ प्रस्तावाला मान्यता देण्यात आली होती. पण आता सुधारित प्रशासकीय मान्यतेनंतर या प्रकल्पाचा खर्च १३२ कोटी ४६ लाख रुपयांवर गेला आहे.

जलजीवन मिशनचा खऱ्च दुप्पट झाला पण तरीही काम अपूर्ण असल्याचा गंभीर ठपका कॅगच्या अहवालात ठेवला आहे. राज्यात सुरु केलेल्या सुमारे ५१ हजार ५६० पाणी पुरवठा योजनांपैकी केवळ १२ हजार ७०३(२४.६४ टक्के) योजना पूर्ण झाल्या. ३८ हजार ८५७ योजना(७५.३ टक्के) प्रलंबित असल्याचा ठपका कॅगच्या अहवालात ठेवला आहे. या योजनेला केंद्राचा निधी मिळता त्यातून राज्याला ५९ कोटी ७४० कोटी रुपये मिळणे अपेक्षित होते. पण उपयोगित प्रमाणपत्र उशीरा दिल्याने केवळ २७ हजार ६५७ कोटी रुपये(४६.३ टक्के निधी) मिळाल्याच्या त्रुटीकडे कॅगच्या अहवालात बोट ठेवले आहे.

Printed, Published and Owned by Rakesh Shankar Gore and Printed at Somani Printing Press, Unit no.04, Ground Floor, N.K. Industrial Estate, off. Aarey Road, near Pravasi Ind. Estate, Gate no.2, Goregaon (east) Mumbai-400063, and Published at Shop no. १२, B-2, Sai Dham Shopping Center, Mangal Nagar,१५ No. Last Bus Stop, Near G.C.C. Club, Mira Road (east), Dist: Thane-401107, Maharashtra. Editor- Rakesh Shankar Gore. RNI REG. No: MAHBIL/2023/86118. Office Contact no. 9702386118, Email: dainiklokrakshanay@gmail.com, Website: www.lokrakshanay.com (ठाणे न्याय कक्षेत)

# गणेशोत्सवातील अतितीव्र लेझर बीमवर राज्यव्यापी बंदीची मागणी

**ठाणे (सम्यक कासारे) :** गणेशोत्सव, गणेश विसर्जन मिरवणुका तसेच इतर सार्वजनिक व धार्मिक मिरवणुकांमध्ये नागरिकांच्या डोळ्यांना आणि वाहनचालकांच्या दृष्टीला धोका निर्माण करणाऱ्या अतितीव्र लेझर लाईट व लेझर बीमच्या वापरावर संपूर्ण महाराष्ट्रात प्रतिबंध घालावा, अशी मागणी जनहितार्थ निवेदक तथा व्हिसल ब्लोअर कार्यकर्ते अनिल मारुती महाडिक यांनी केली आहे.



या मागणीसंदर्भात महाडिक यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री व गृह मंत्री, उपमुख्यमंत्री, मुख्य सचिव, गृह विभागाचे प्रधान सचिव तसेच पोलीस महासंचालक यांच्याकडे दिनांक २८ ऑगस्ट २०२६ रोजी जनहितार्थ निवेदन सादर केले आहे. या निवेदनाची प्रत मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशांकडेही पाठविण्यात आली आहे.

महाराष्ट्र टाइम्समध्ये प्रसिद्ध झालेल्या ‘लेझर लाईटच्या वापरामुळे अध्यक्षास दंड, कारावास’ या आशयाच्या वृत्ताचा संदर्भ देत महाडिक यांनी अतिप्रखर लेझर लाईटच्या वापरामुळे निर्माण होणाऱ्या संभाव्य धोक्याकडे शासनाचे लक्ष वेधले आहे. गणेशोत्सवाच्या मिरवणुकांमध्ये महिला, लहान मुले, ज्येष्ठ नागरिक, वाहनचालक तसेच पोलीस आणि इतर शासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी होत असल्याने अशा वेळी प्रखर लेझर बीम थेट डोळ्यांवर पडल्यास दृष्टीदोष, डोळ्यांना इजा किंवा अपघाताचा धोका निर्माण होऊ शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

## जनहितार्थ निवेदक अनिल महाडिक यांचे मुख्यमंत्री, गृह विभाग व पोलीस महासंचालकांना निवेदन

एखादी घटना घडल्यानंतर कारवाई करण्याऐवजी संभाव्य धोका टाळण्यासाठी शासनाने आधीच प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे आवश्यक असल्याचे महाडिक यांनी म्हटले आहे. त्यामुळे केवळ एखाद्या शहरापुरती किंवा पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रापुरती कारवाई न करता संपूर्ण महाराष्ट्रासाठी एकसमान नियमावली लागू करण्याची मागणी त्यांनी केली आहे.

महाडिक यांनी केलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये सार्वजनिक, धार्मिक व गणेशोत्सवाच्या मिरवणुकांमध्ये धोकदायक लेझर बीमच्या वापरावर प्रतिबंध, लेझरच्या सुरक्षित तांत्रिक मर्यादा निश्चित करणे, गणेश मंडळे व आयोजकांकडून लेखी हमी घेणे आणि मिरवणुकीपूर्वी लेझर उपकरणांची तपासणी करण्यासाठी विशेष पथके नियुक्त करणे यांचा समावेश आहे.

याशिवाय नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आयोजक, मंडळाचे पदाधिकारी, लेझर ऑपरेटर व कंत्राटदारांवर लागू कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, वारंवार नियम मोडणाऱ्या मंडळांवर पुढील कार्यक्रमांसाठी कठोर अटी घालाव्यात, अशीही मागणी करण्यात आली आहे.

# दुर्गाडी किल्ला परिसरात वाहतूक कोंडी; प्रवाशांचा संताप

**कल्याण (गणेश बागडे) :** कल्याण पश्चिमेतील दुर्गाडी किल्ला, लालचौकी परिसर रविवारी दुपारपासून वाहतूक कोंडीत अडकला. रुग्णवाहिका, अत्यावश्यक सेवेच्या वाहनांना या कोंडीचा फटका बसला. वाहतूक पोलिसांचे योग्य नियोजन नसल्याने ही कोंडी झाल्याची टीका प्रवाशांनी केली.



कल्याण शहरात भिवंडी, पडघा गांधारी, शिळफाटा, अहिल्यानगर मुरबाडमार्गे वाहने शहरात येतात. आणि याच मार्गाने शहराबाहेर जातात. ही वाहने शहराबाहेर येण्याचे, जाण्याचे मार्ग मर्यादित आहेत. या रस्त्यांवर दररोज हजारो वाहने धावतात. ही वाहने योग्य नियोजन करून शहरात आणि शहराबाहेर पडली नाहीतर कल्याण शहर कोंडीत अडकते. रविवारी दुपारी वाहतूक विभागाच्या नियोजन शून्य कारभाराचा फटका प्रवाशांना बसला.

दुपारपासून दुर्गाडी किल्ला भागात वाहन कोंडीला सुरूवात झाली होती. ही कोंडी वाढत गेल्यामुळे लालचौकी, खडकपाडा, पडघा गांधारी मार्गे दुर्गाडी किल्ला, शिळफाटामार्गे दुर्गाडी किल्ला, शिवाजी चौकाकडे येणारी वाहने कोंडीत अडकत गेली. याच रस्त्यावरून उलटमार्गिकेतून जाणारी वाहने मग जागोजागी अडकून पडली. दुर्गाडी किल्ला भवानी चौकातील वाहन कोंडी सोडविण्यास विलंब झाल्याने या रस्त्याच्या परिसरातील गोविंदवाडी बाह्यवळण रस्ता, लालचौकी, खडकपाडा रस्ता वाहनांनी गजबजून गेले. भवानी चौकात एक वाहन पाच मिनिटाच्या वर एक सेकंद थांबले तरी दुर्गाडी किल्लाच्या चारही बाजुचे रस्ते क्षणात कोंडीत अडकतात, असे टिटवाळा येथील सामाजिक कार्यकर्ते विजय देशेकर यांनी सांगितले.

# अँटिलिया प्रकरणी तत्कालीन पोलीस आयुक्त परमवीर सिंग यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह



**कल्याण (आकाश कांबळे) :** अँटिलिया प्रकरणातील तपास यंत्रणेच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त बी. आर. घाडगे यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. याचिकेच्या माध्यमातून तत्कालीन पोलीस आयुक्त परमवीर सिंग यांच्या भूमिकेवर गंभीर प्रश्न उपस्थित करण्यात आले आहे. या याचिकेवर सोमवारी सुनावणी होणार आहे. कल्याण येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत घाडगे आणि त्यांचे वकील अ‍ॅड. भूषण बेंद्रे यांनी यासंदर्भातील माहिती दिली.

अँटिलिया प्रकरणात ‘टेलिग्राम’ या माध्यमातून एक संदेश प्राप्त झाला होता. या संदेशामध्ये ‘जैश उल हिंद’ या संघटनेने जबाबदारी स्वीकारल्याचा दावा करण्यात आला होता. २१ मार्च २०२१ रोजी सायबर तज्ज्ञ ईशांत सिन्हा यांनी या संदेशासंदर्भातील माहिती तत्कालीन मुंबई पोलीस आयुक्त परमबीर सिंह यांना दिल्याचे सांगण्यात येते. जैश उल हिंद या संघटनेचा जो मेसेज होता तो तिहार जेलमधून ऑपरेट केला गेला असल्याचे सायबर एक्स्पर्ट यांनी सांगितले.

## ● सेवानिवृत्त सहाय्यक पोलीस आयुक्त बी. आर. घाडगे यांची उच्च न्यायालयात याचिका
## ● सोमवारी या प्रकरणावर होणार सुनावणी

परमबीर सिंह यांनी ईशांत सिन्हा यांना संबंधित माहिती मुंबई पोलीस आयुक्तांच्या अधिकृत ई-मेलवर पाठवण्यास सांगितले. त्यासाठी सिन्हा यांना पाच लाख रुपये देण्यात आहे. ही सर्व बाब सायबर एक्सपर्ट ईशांत सिन्हा यांनी तपास यंत्रणेला दिलेल्या आपल्या जवाबात समोर आली आहे. त्यानंतर सिन्हा यांनी तयार केलेल्या अहवालामध्ये काही बाबी वाढवून तो पुढे पाठवण्यात आल्याचे तपास यंत्रणेला दिलेल्या त्यांच्या जबाबातून समोर आल्याचा दावा घाडगे आणि अ‍ॅड. बेंद्रे यांनी केला आहे.ईशांत सिन्हा यांनी २५ ऑगस्ट २०२१ रोजी तपास यंत्रणेच्या अधिकाऱ्यांसमोर हा जबाब नोंदवला असल्याचे त्यांनी सांगितले. ईशांत सिन्हा हे तपासातील साक्षीदार क्रमांक १५२ असल्याचेही घाडगे यांनी सांगितले. त्यांच्या जबाबाची प्रत घाडगे आणि अ‍ॅड. भूषण बेंद्रे यांनी पत्रकार परिषदेत प्रसारमाध्यमांसमोर सादर केली.

या पार्श्वभूमीवर, परमबीर सिंह यांनी सायबर तज्ज्ञाला पाच लाख रुपये का दिले? हे पैसे कुठून देण्यात आले? अहवालात कथितरीत्या वाढीव माहिती का समाविष्ट करण्यात आली? आणि या प्रकरणात परमबीर सिंह यांना आरोपी का करण्यात आले नाही? असे प्रश्न घाडगे यांनी उपस्थित केले आहेत. या सर्व बाबींची चौकशी करून तपास यंत्रणेच्या भूमिकेची चौकशी करण्यात यावी या मागणीसाठी उच्च न्यायालयात याचिका दाखल करण्यात आल्याचे घाडगे आणि त्यांच्या वकिलांनी सांगितले.

# नवीन जलवाहिनी जोडणी देऊ नये; नगरसेवक सुभाष साळुंके यांची मागणी

**अंबरनाथ (विशाल कारंडे) :** शहरातील काही भागात अनियमित पाणीपुरवठा होत असल्याने नागरिक व लोकप्रतिनिधींकडून वारंवार तक्रारी तसेच आंदोलने करण्यात येत आहेत.

अंबरनाथ शहराची वाढती लोकसंख्या पाहता सध्या उपलब्ध असणारे पाणी व पाणीसाठा हा नियमित बिल भरणाऱ्या अंबरनाथकरांना आवश्यकतेनुसार मिळाला पाहिजे, अशी रास्त मागणी नागरिक व लोकप्रतिनिधींकडून होत आहे.लोकप्रिय उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली कल्याण लोकसभा मतदारसंघाचे खासदार डॉ. श्रीकांतजी शिंदे व आमदार डॉ. बालाजी किणीकर यांच्या पुढाकाराने अंबरनाथ शहरासाठी ९६ एमएलडी क्षमतेची स्वयंपूर्ण महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा योजना अमृत टप्पा-२ अंतर्गत ₹२५८ कोटी खर्चाची मंजूर करण्यात आली आहे.




सदर योजना नालंबी जवळच्या उल्हास नदी पात्रातून जॅकवेलद्वारे सुरू करण्यात आली असून, यामध्ये तीन झाडी येथे जलशुद्धीकरण केंद्र, ११ उंच जलकुंभ, तसेच अंबरनाथ पूर्व, पश्चिम व ऑर्डनन्स फॅक्टरी परिसर आदी ठिकाणी गुरुत्वाकर्षण पद्धतीने पाणीपुरवठा करण्यासाठी स्वतंत्र ३ वेगवेगळ्या पाण्याच्या जलवाहिन्या टाकण्यात येत आहेत.परंतु, सद्यस्थिती पाहता पाणीपुरवठ्याचे नियोजन करण्यात महाराष्ट्र जीवन प्राधिकरण प्रशासन अपयशी ठरत असल्याचे दिसून येत आहे. नवीन पाणीपुरवठा योजना जलद गतीने पूर्ण करून घेणे आणि सध्या उपलब्ध असलेले पाणी त्रस्त नागरिकांना नियमित देणे गरजेचे आहे.दिवसेंदिवस नवीन गृहप्रकल्प व इमारती मोठ्या संख्येने वाढत असून, त्यांना इमारत पूर्णत्वाचा दाखला मिळाल्यानंतर त्वरित नवीन पाणीपुरवठा जोडणी करण्यात येते. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरातील नागरिकांना कमी दाबाने पाणीपुरवठा होत आहे. यामुळे पाणीग्राहक व नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत असून, अंबरनाथ पश्चिम भागातील अनेक ठिकाणी नागरिकांना या समस्येचा त्रास सहन करावा लागत आहे.

नागरिकांचा सध्याचा रोष कमी करण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाला प्राप्त होणारे पाणी प्राधान्याने नियमित ग्राहकांना सुरळीतपणे देणे आवश्यक आहे. नियमित ग्राहकांवर अन्याय होऊ नये आणि त्यांचे हक्काचे पाणी इतरांना देण्यात येऊ नये, अशी मागणी करण्यात आली आहे.

सध्या अमृत टप्पा-२ ही महत्त्वाकांक्षी योजना अंतिम टप्प्यात आली आहे. योजना पूर्ण होईपर्यंत नव्याने होत असलेल्या गृहप्रकल्पांना व आस्थापनांना नवीन पाणीपुरवठा जोडणी देण्यात येऊ नये. तसेच पुनर्विकसित होणाऱ्या जुन्या इमारतींना पूर्वी मंजूर असलेल्या कनेक्शनच्या संख्येइतकीच जोडणी देण्यात यावी. त्यामध्ये वाढीव कनेक्शन देऊ नयेत, अशी सूचना व मागणी शिवसेना नगरसेवक सुभाष साळुंके यांनी अंबरनाथ विभागाचे कार्यकारी अभियंता श्री. गायकवाड यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

# कोल्हापूरचा प्रवीण कांबळे, नाशिकची रविना गायकवाड ठाणे मॅरेथॉनमध्ये प्रथम

**ठाणे (रोहित जैसवार) :** ठाणे महापालिका आणि ठाणे जिल्हा ॲथलेटिक्स असोसिएशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉनस्पर्धेत पुरुष गटात कोल्हापूरचा प्रविण कांबळे याने अव्वल स्थान पटकावले. त्याने १ तास ७ मिनिटे आणि २१ सेकंदासह २१ किमीचे अंतर पार केले. तर, महिला गटात नाशिकची रविना गायकवाड हिने १ तास २६ मिनिटे आणि ४ सेकंद या वेळेत



शर्यत पूर्ण केली. या स्पर्धेत सुमारे ३० हजार स्पर्धकांनी सहभाग नोंदवला होता.ठाण्यात रविवार सकाळी ३२ व्या ठाणे महापौर वर्षा मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी पुरुष गटाच्या तर त्यांच्या पत्नी लता शिंदे यांनी महिला गटाच्या स्पर्धेला झेंडा दाखवला. त्यानंतर, टप्प्याटप्याने एकूण १४ गटातील स्पर्धांचा शुभारंभ महापालिका मुख्यालयासमोरील चौकातून करण्यात आला. ६० वर्षावरील ज्येष्ठ नागरिकांच्या स्पर्धेत महिला आणि पुरुष गटात ज्येष्ठ नागरिक सहभागी झाले होते. त्याचबरोबर, दिव्यांगांच्या त्रिदल समुहानेही या मॅरेथॉनमध्ये विशेष सहभाग घेतला. महापालिका अधिकारी कर्मचारी व लोकप्रतिनिधी यांच्यासाठी एक किमीची ”कॉर्पोरेट रन” ठेवण्यात आली होती. या स्पर्धेत महापालिका अधिकारी, कर्मचारी, पत्रकार यांनी सहभाग घेतला.चित्रपटसृष्टीतील मंगेश देसाई, गश्मीर महाजनी किशारी आंबिये, ऐश्वर्या नारकर, अभिज्ञा भावे, हरिश थोरात, स्वराज नागांवकर, शिवानी सोनार, विजया बाबर, निखिल दामले, रोहित परशुराम, ट्विंकल यादव, दक्षता जुईल, अनुज साळुंखे, प्रतिक्षा शिवणकर, तनुष्का विशेल, चेतन गौरव, समीर परांजपे, अनघा ठाकूर उपस्थित होते. कलाकारांनी देखील स्पर्धकांचा उत्साह वाढवत एक कि.मी स्पर्धेत सहभाग घेतला.

विविध १४ गटात झालेल्या या स्पर्धेत विजेत्यांना ११ लाख रुपयांची रोख पारितोषिके देण्यात आली. २१ कि.मी स्पर्धेतील विजेत्यास एक लाख रुपयांचे रोख पारितोषिक, सन्माचिन्ह, पदक आणि प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले.

# शीतकपाट ठरले जीवघेणे; आईस्क्रीम विक्रेत्याचा मृत्यू

**डोंबिवली (प्रतिनिधी) :** डोंबिवली पश्चिमेत जुनी डोंबिवली भागातील एका ३७ वर्षाच्या आईसक्रिम विक्रेत्याचा आईसक्रिम ठेवण्याच्या शीतकपटातील वीज वाहक तारांचा धक्का लागून मृत्यू झाला. या आईसक्रिम विक्रेत्याला तात्काळ उपस्थितांनी कल्याण डोंबिवली पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात उपचारासाठी नेले. तेथे वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला तपासून मृत घोषित केले.



जगदीश लाल गाडरी (३२) असे आईसक्रिम विक्रेत्याचे नाव आहे. ते जुनी डोंबिवलीतील वैभव मंगल कार्यालयाजवळील ताराबाई चाळीत आपल्या कुटुंबीयांसह राहत होते. मागील अनेक वर्ष ते जुनी डोंबिवली भागात आईसक्रिम विक्रीचा व्यवसाय करतात. जगदीश गाडरी यांच्या मृत्युप्रकरणी गणेश कुमावत यांनी विष्णुनगर पोलीस ठाण्यात माहिती दिली. पोलिसांनी या माहितीवरून, वैद्यकीय अहवालावरून घडल्या घटनेची पोलीस रोजनिशीत नोंद करून घेतली. कुमावत हे वेल्डर म्हणून काम करतात. ते मुळचे राजस्थानमधील रहिवासी आहेत. सध्या ते कुटुंबीयांसह मोठागावमधील लोटेवाडी भागात राहतात.

जगदीश गाडरी यांचा आईसक्रिम विक्रीचा व्यवसाय असल्याने त्यांच्या दुकानात आईसक्रिम ठेवण्याचे मोठे शीतकपाट होते. या शीतकपाटाची ते नियमित विद्युत तारतंत्रीकडून देखभाल दुरूस्ती करून घेत होते. नियमित बर्फ, पाण्याशी शीतकपाटाचा संपर्क येत असल्याने या शीतकपाटाच्या माध्यमातून कोणत्याही प्रकारचा धोका उद्भवणार नाही याची काळजी ते घेत होते. आपले शीतकपाट सुस्थितीत आहे याची जाणीव असल्याने ते सर्रास आईसक्रिम ग्राहकांना देताना, ठेवण्यासाठी सहजपणे वापर करत होते.बुधवारी ते आपल्या आईसक्रिम विक्री दुकानात सकाळपासून कार्यरत होते. ग्राहक सेवा देत होते. दिवसभर आईसक्रिम ठेवण्याचे शीतकपाट सुस्थितीत होते. संध्याकाळी साडे सहा वाजण्याच्या दरम्यान ते शीतकपाट उघडून आईसक्रिम काढत असताना त्यांना शीतकपाटात जीवंत विद्युत प्रवाह आल्याचे जाणवले. पाणी, जीवंत वीज प्रवाह एकाचवेळी एकाच ठिकाणी आल्याने शीतकपाटाला हात लावत असतानाच आईसक्रिम विक्रेते जगदीश गाडरी यांना विद्युत प्रवाहाचा जोरदार धक्का बसला. ते मोठ्याने ओरडून जमिनीवर कोसळले. उपस्थित ग्राहकासह आजुबाजुच्या व्यापाऱ्यांना आईसक्रिम विक्रेत्याच्या दुकानात मोठ्याने आवाज झाल्याने ते दुकानाच्या दिशेने धावले. त्यावेळी जगदीश बेशुध्द होऊन दुकानात कोसळले होते. तात्काळ जगदीश यांच्या नातेवाईकांना शेजारील व्यापाऱ्यांनी बोलावून घेतले. त्यांना तातडीने पालिकेच्या शास्त्रीनगर रुग्णालयात उपचारासाठी नेण्यात आले. त्यावेळी डॉक्टरांनी त्यांना तपासून ते मृत घोषित केले.

# डोंबिवलीच्या डॉ. अमृता वेलणकर यांचे थायलंडमध्ये ‘कॉस्मेटोलॉजी’वर सादरीकरण

**डोंबिवली (प्रथमेश चव्हाण) :** डोंबिवलीच्या रहिवासी असलेल्या डॉ. अमृता वेलणकर-कामतेकर यांनी थायलंडमधील फुकेत येथे झालेल्या ऑरा २०२६ या ग्लोबल ॲस्थेटिक आणि रिजनरेटिव्ह या आंतरराष्ट्रीय परिषदेत दिर्घायु पंचकर्म आणि कॉस्मेटिक क्लीनिकतर्फे ‘आयुर्वेदिक कॉस्मेटॉलॉजी आणि ट्रीकॉलॉजी’ या विषयावर सादरीकरण केले.



थायलंड येथील या आंतरराष्ट्रीय परिषदेला विविध देशांमधील कॉस्मेटोलॉजी, एस्थेटिक मेडिसिन आणि रिजनरेटिव्ह मेडिसिन क्षेत्रातील तज्ज्ञ उपस्थित होते. या क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शक, संशोधक या परिषदेत सहभागी झाले होते. आयुर्वेदातील सौंदर्यविषयक संकल्पना, केस व टाळूचे आरोग्य, तसेच आधुनिक कॉस्मेटोलॉजीशी आयुर्वेदाचा समन्वय याविषयावर डॉ. अमृता कामतेकर-वेलणकर यांनी परिषदेला मार्गदर्शन केले. आयुर्वेदिक सौंदर्यशास्त्राची शास्त्रीय आणि आधुनिक मांडणी यांची सांगड आणि त्याविषयीचे सादरीकरण डॉ. अमृता कामतेकर यांनी केले.आयुर्वेदिक कॉस्मेटोलॉजी व ट्रायकॉलॉजी विषयाला आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर प्रभावीपणे मांडण्याचा हा दिर्घायु पंचकर्म आणि कॉस्मेटिक क्लीनिकसाठी, तसेच डॉ. अमृता कामतेकर-वेलणकर यांच्या व्यावसायिक प्रवासातील महत्त्वपूर्ण टप्पा ठरला.

# रबाळे एमआयडीसीत कंपनीला भीषण आग

## ज्वलनशील फोममुळे आगीचा भडका | जीवितहानी टळली

**नवी मुंबई (धनश्री सट्टा) :** नवी मुंबईतील रबाळे एमआयडीसी परिसरातील एका कंपनीला रविवारी (दि. ३०) सकाळी भीषण आग लागली. आगीची माहिती मिळताच नवी मुंबई अग्निशमन दलाच्या सुमारे आठ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. अग्निशमन दलाच्या जवानांनी शर्थीचे प्रयत्न करत आगीवर नियंत्रण मिळवले.

सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र, कंपनीत मोठ्या प्रमाणात ज्वलनशील साहित्य असल्याने पुन्हा आग भडकण्याची शक्यता लक्षात घेता सध्या कुलिंग ऑपरेशन सुरू आहे.



**कंपनीत आगीचा भडका**

प्राथमिक माहितीनुसार, रबाळे एमआयडीसीतील संबंधित कंपनीत स्पंज तयार करण्याचे काम केले जाते. आगीचे व्हिडीओ समोर आले असून, त्यामध्ये कंपनीतून मोठ्या प्रमाणात धूर निघताना तसेच अग्निशमन दलाचे जवान आग विझवताना दिसत आहेत.

**ज्वलनशील साहित्यामुळे धुराचे लोट**

कंपनीत पॉलीयुरेथेन फोमसारख्या ज्वलनशील साहित्याचा वापर केला जात असल्याची माहिती आहे. त्यामुळे आगीने काही वेळातच उग्र रूप धारण केल्याचे सांगण्यात येत आहे. आगीमुळे कंपनीतील उपकरणे आणि साहित्याचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे.

**अग्निशमन दलाचे शर्थीचे प्रयत्न**

आगीची माहिती मिळताच नवी मुंबई अग्निशमन दलाच्या सुमारे आठ गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. जवानांनी दीर्घ प्रयत्नांनंतर आगीवर नियंत्रण मिळवले. त्यानंतर कंपनीच्या परिसरात पुन्हा आग लागू नये यासाठी कुलिंग ऑपरेशन सुरू करण्यात आले आहे.

**जीवितहानी नाही**

या दुर्घटनेत आतापर्यंत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आगीमुळे झालेल्या नुकसानीचा नेमका आकडा आणि दुर्घटनेचे कारण तपासणीनंतर स्पष्ट होण्याची शक्यता आहे.

**रबाळे एमआयडीसी महत्त्वाचे औद्योगिक क्षेत्र**

रबाळे एमआयडीसी हे ठाणे-बेलापूर औद्योगिक पट्ट्यातील महत्त्वाचे औद्योगिक क्षेत्र आहे. या परिसरात उत्पादन, रसायन आणि विविध व्यावसायिक कंपन्या आहेत. त्यामुळे औद्योगिक परिसरात लागलेल्या या आगीने काही काळ चिंता निर्माण झाली होती.

**तुर्भेतील इलेक्ट्रॉनिक्स दुकानालाही आग**

याच वर्षी मार्चमध्ये तुर्भे सेक्टर २१ येथील एका इलेक्ट्रॉनिक्स दुकानाला भीषण आग लागली होती. घटनेची माहिती मिळताच वाशी, नेरुळ, ऐरोली आणि बेलापूर येथून अग्निशमन दलाच्या गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. त्या आगीचे नेमके कारणही स्पष्ट झाले नव्हते.

# गणेशोत्सवाआधी फळे महागणार; आवक घटल्याने घाऊक बाजारात दरवाढ

**नवी मुंबई (भावना जैन) :** मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीच्या (एपीएमसी) फळ बाजारात आवक घटल्याने काही प्रमुख फळांच्या दरात वाढ झाली आहे. पावसाळी वातावरणाचा फळबागांवरील परिणाम, हंगामानुसार उत्पादनातील चढ-उतार आणि काही भागांतून मालाची काढणी व वाहतुकीवर झालेला परिणाम यामुळे आवक कमी झाल्याची शक्यता व्यापाऱ्यांकडून व्यक्त केली जात आहे. त्यातच श्रावण महिन्यातील



उपवास आणि सणासुदीच्या काळात फळांना असलेली मागणी कायम असल्याने दरावर परिणाम झाला आहे.फळांची आवक घटण्यामागे पावसाळ्यातील हवामानाचा फळबागांवर होणारा परिणाम, फळगळ, कीड-रोग तसेच हंगामानुसार उत्पादनातील बदल ही कारणे असू शकतात. पावसामुळे काही ठिकाणी काढणी आणि वाहतुकीवरही परिणाम होतो. मात्र, प्रत्येक फळाच्या आवकेत झालेल्या घटीमागे एकच कारण नसून उत्पादक भागानुसार परिस्थिती बदलत असल्याचे मत फळ व्यापाऱ्यांनी व्यक्त केले. घाऊक बाजारात दरवाढ झाल्याने किरकोळ बाजारातही दरवाढीची शक्यता व्यापाऱ्यांनी व्यक्त केली आहे.दरम्यान, आवक घटली असली तरी सर्वच फळांचे दर वाढलेले नाहीत. डाळिंबाची आवक १,५८९ वरून ७९५ क्विंटलवर आली असली तरी त्याचा सरासरी दर १३५ रुपयांवरून १३० रुपये प्रतिकिलो झाला. अननसाची आवक ८०० वरून ३०० क्विंटल झाली; मात्र त्याचा सरासरी दर ५५ रुपये प्रतिकिलोवर स्थिर राहिला. यावरून केवळ आवक घटणे नव्हे, तर मागणी आणि उपलब्ध पुरवठ्याचाही दरांवर परिणाम होत असल्याचे व्यापाऱ्यांनी स्पष्ट केले.

# उरण-पनवेल मार्ग होणार दुप्पट रुंद; ७ कोटींच्या कामाला पावसाळ्यानंतर सुरुवात

**उरण (सचिन कदम) :** बोकडवीरा पोलीस चौकी ते कोट नाका दरम्यानच्या १ हजार ६०० मीटर लांबीच्या उरण-पनवेल मार्गाचे रुंदीकरण पावसाळ्यानंतरच सुरू होणार आहे, अशी माहीती सार्वजनिक बांधकाम विभागाकडून देण्यात आली आहे.

यासाठी ७ कोटींचा निधी खर्च होणार आहे.उरण-पनवेल मार्ग हा सध्या सात मीटर रुंद असून तो आता १४ मीटर रुंद



होणार आहे. तसेच या मार्गावर दुभाजकही बसविण्यात येणार आहेत. त्यासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाने निविदा काढली असून कामही सुरू झाले होते.

मात्र पावसामुळे हे काम रखडले असून पावसाळा संपताच कामाला सुरुवात होणार असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने सांगितले आहे.उरण ते नेरुळ/ बेलापूर लोकल आणि उरणच्या द्रोणागिरी परिसरात वाढणारी लोकवस्ती यामुळे उरण-पनवेल मार्ग हा प्रचंड रहदारीचा मार्ग बनला आहे. या मार्गावरील वाढत्या वाहनांमुळे अपघातही वाढले आहेत.

दुहेरी मार्ग असलेल्या या मार्गाचे रुंदीकरण करण्याची मागणी अनेक वर्षांपासून होत आहे. त्यात पावसाळ्यात मार्गाच्या बाजूला झाडाझुडपांत वाढ होऊन तो अधिकच अरुंद होतो. त्यामुळे वाहन चालवणे जिकरीचे होते. उरण-पनवेल मार्ग दोन अस्थापनांत विभागला गेला आहे.

यात नवघर ते बोकडवीरा पोलीस चौकी पर्यंतचा मार्ग सिडकोकडे तर कोटनाका ते पोलीस चौकी हा मार्ग सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहे. या मार्गाच्या रुंदीकरणामुळे प्रवाशांना दिलासा मिळणार आहे.

# रेल्वे रुळांवरूनच रोजचा प्रवास; वैतरणा-वाढीवकरांच्या जीवाशी खेळ

**वसई (सुचिता सोनावणे) :** विरारजवळील वैतरणा व वाढीव बेटावर राहणाऱ्या नागरिकांना ये-जा करण्यासाठी कोणत्याही प्रकारची वाहतूक सुविधा उपलब्ध नाही. त्यामुळे येथील शाळकरी विद्यार्थी आणि नागरिकांना रेल्वे रुळावरून जीव धोक्यात घालून प्रवास करावा लागत आहे. या समस्येवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यात यावी, अशी जोरदार मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

पश्चिम रेल्वेवरील विरारवरून डहाणूच्या दिशेने प्रवास करताना वैतरणा-वाढीव परिसर लागतो. या भागात मोठ्या प्रमाणावर नागरी वस्ती आहे, मात्र गेल्या अनेक वर्षांपासून येथे ये-जा करण्यासाठी रस्ता किंवा योग्य सुविधा उपलब्ध होऊ शकलेली नाही. सध्याच्या स्थितीत येथील नागरिकांना रेल्वे पुलावरूनच अत्यंत धोकादायक प्रवास करावा लागत असून, यामुळे सातत्याने अपघाताच्या घटना घडत आहेत.



वाढीव भागातील मोठ्या संख्येने शाळकरी विद्यार्थी शिक्षणासाठी वैतरणा येथील शाळेत जातात. या विद्यार्थ्यांनाही दररोज रेल्वे रुळांवरूनच प्रवास करावा लागतो. अलीकडेच 'डेडिकेटेड फ्रेट कॉरिडॉर' मार्गिका सुरू झाल्याने या मार्गावरील मालवाहतूक गाड्यांची संख्या वाढली आहे, ज्यामुळे अपघाताचा धोका अधिकच गंभीर बनला आहे. जिल्ह्यात सध्या मोठे मोठे प्रकल्प उभे राहत आहेत. मात्र येथील ग्रामस्थांना ये-जा करण्यासाठी साधी मार्गिकाही अजून तयार करण्यात आलेली नाही, अशी खंत नागरिकांनी व्यक्त केली.

मालगाड्या किंवा एक्स्प्रेस गाड्या येतात, तेव्हा नागरिकांना घाईघाईने रेल्वे रुळावरून बाजूला होऊन एका कडेला उभे राहावे लागते. कामधंद्यासाठी तसेच दैनंदिन जीवनावश्यक वस्तू आणण्यासाठी नागरिकांना वैतरणा रेल्वे स्थानकापर्यंतच पायी जावे लागते. गॅस सिलेंडर, तांदळाची पोती आणि इतर अवजड सामान डोक्यावर घेऊन रेल्वे पुलावरून चालत जावे लागत असल्याचे येथील महिलांनी सांगितले. यासाठी योग्य ती वाहतूक व्यवस्था आणि पर्यायी मार्ग उपलब्ध करून देण्याची मागणी होत आहे.

**खासदार डॉ. हेमंत सवरा यांच्याकडून परिसराची पाहणी**

वैतरणा–वाढीव बेटावरील विद्यार्थी आणि नागरिकांना भेडसावणाऱ्या या गंभीर समस्येची दखल घेत खासदार डॉ. हेमंत सवरा यांनी शनिवारी रेल्वे अधिकाऱ्यांसह रेल्वे रूळ आणि रेल्वे स्थानक परिसराचा पाहणी दौरा केला. यावेळी आमदार राजन नाईक, भाजप जिल्हाध्यक्ष प्रज्ञा पाटील व नागरिक उपस्थित होते. यावेळी खासदारांनी स्थानिक नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या आणि याप्रश्नी रेल्वे प्रशासनाकडे तातडीने पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.

वाढीव आणि वैतरणा या दोन्ही भागांना जोडण्यासाठी कायमस्वरूपी पुलाची उभारणी व्हावी, यासाठी राज्याचे मुख्यमंत्री व पालकमंत्र्यांची भेट घेऊन चर्चा करणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेचवाढीव भागातील नागरिकांना सध्या अन्य कोणताही पर्याय नसल्यामुळे तात्पुरत्या स्वरूपात फेरीबोट सुरू करण्यासाठीही पाठपुरावा केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले. रेल्वे स्थानक परिसरात ज्या समस्या उद्भवत आहेत, त्यावर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा स्पष्ट सूचना त्यांनी उपस्थित रेल्वे अधिकाऱ्यांना दिल्या.


**रेल्वे स्थानकातील प्रलंबित समस्यांकडे वेधले लक्ष**

डहाणू वैतरणा प्रवासी सेवाभावी संस्थेच्या वतीने वैतरणा रेल्वे स्थानकातील विविध प्रलंबित समस्यांबाबत खासदार डॉ. हेमंत सवरा यांना निवेदन देण्यात आले. संस्थेचे उपाध्यक्ष सतीश गावड यांनी सांगितले की, खालील मुद्द्यांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे . पावसाळ्यात भुयारी मार्गात साचणारे पाणी आणि स्थानकाबाहेरील रस्त्यांची झालेली दुरवस्था. प्रवाशांसाठी मूलभूत सुविधा आणि सुरक्षित पर्यायी मार्गाची उपलब्धता. प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने डीएफसीसी रेल्वे मार्ग ओलांडण्याची वेळ नागरिकांवर येऊ नये, यासाठी तातडीने सुरक्षित पदपथ किंवा पादचारी पूल तयार करण्यात यावा अशी मागणी केली आहे.

# सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यात राज्यात पाऊस पडण्याची शक्यता

**मुंबई (विशाल कारंडे) :** राज्यात आतपर्यंत ऑगस्ट महिन्यात दिलासादायक पावसाची नोंद झाली नाही. मागील काही दिवसांपासून काही जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी वादळी पावसाची नोंद होत असली तरीही एकंदरीतच पावसाचा जोर ओसरला आहे. त्यामुळे अनेक भागात असणारी पावसाची तूट आणखीन वाढण्याचा अंदाज आहे. दरम्यान, हवामान प्रणालींच्या सक्रियतेमुळे सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यात राज्यातील काही भागात मुसळधार ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

यंदा हवामान बदलाचे चटके प्रकर्षाने जाणवत आहेत. प्रशांत महासागरातील 'एल निनो' स्थितीचा वाढता प्रभाव उर्वरित मान्सूनच्या हंगमावर राहील, अशी शक्यता हवामान विभागाने यापूर्वीच व्यक्त केली आहे. देशात आतापर्यंत ऑगस्ट महिन्यात ७० टक्केहून अधिक भागात सरासरीहून कमी पावसाची नोंद झाली आहे, तर आटपर्यंतच्या मान्सूनच्या




हंगामात नोंद झालेल्या पावसाच्या आकडेवारीनुसार देशात १३.७ टक्के पावसाची तूट आहे. महाराष्ट्रातही अनेक भागात पावसाची तूट कायम आहे. यात विदर्भ आणि मराठवाडा प्रदेशातील काही जिल्ह्यांमध्ये मोठी तूट आहे.

दरम्यान, शनिवारी बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र तयार झाले असून त्याची तीव्रता वाढण्याचा अंदाज आहे. या क्षेत्राचा सर्वाधिक प्रभाव सध्या ओडिशा, अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय , छत्तीसगड आणि पश्चिम बंगाल आदी भागांवर आहे. दरम्यान, राज्यात आज विदर्भातील गडचिरोली आणि गोंदिया जिल्ह्यातील काही भागात मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. तसेच पुढील दोन ते तीन दिवस बहुतांश भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. मात्र, १० सप्टेंबरनंतर राज्यात पावसाचा जोर पुन्हा कमी होईल, असा अंदाजही हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

हवामान विभागाकडून पुढील चार आठवड्यांसाठी हवामानाचा अंदाज प्रसिद्ध करण्यात आला असून यात ३ ते १० सप्टेंबरच्या दरम्यान राज्यातील प्रामुख्याने कोकण प्रदेशातील जिल्हे मध्य महाराष्ट्रातील काही भागात तसेच विदर्भातील काही भागांमध्ये पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे. तसेच या दरम्यान बहुतांश भागात हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची नोंद होऊ शकते, असा हवामान अभ्यासकांचा अंदाज आहे. दरम्यान, ऑगस्ट आणि सप्टेंबर महिन्यात सरासरीहून कमी पाऊस पडेल, असा अंदाज यापूर्वीच हवामान विभागाने व्यक्त केला आहे. पुढील काही दिवसात पावसाचा जोर वाढल्यास दुष्काळाचे सावट असणाऱ्या प्रदेशांना काहीसा दिलासा मिळेल असा, अंदाज आहे.

# तरुणांच्या ताकदीपुढे सरकार झुकले; नीट पेपरफुटीवरून अमित ठाकरेंची टीका

**वसई (सतीश सोनावणे) :** 'नीट' पेपरफुटी प्रकरण आणि तरुणांवर होणाऱ्या अन्यायावरून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे (मनसे) नेते अमित ठाकरे यांनी केंद्र व राज्य सरकारवर जोरदार टीका केली आहे. पेपर फुटीमुळे तब्बल २१ मुला-मुलींनी आत्महत्या केल्या आणि दिल्लीत आंदोलक विद्यार्थ्यांवर लाठीमार झाला, तरीही सरकारने कोणतीही संवेदनशील किंवा योग्य भूमिका घेतली नाही. मात्र, जेव्हा तरुणांची खरी ताकद दिसली आणि केंद्रातून राजीनामे आले, तेव्हाच सरकारला या तरुण पिढीच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्याची आठवण झाली, असा थेट टोला त्यांनी लगावला.



शनिवारी विरार येथील नवीन विवा महाविद्यालयात तरुणांशी संवाद साधण्यासाठी एका विशेष 'युवा संवाद' कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाला मनसे नेते अमित ठाकरे प्रामुख्याने उपस्थित होते. अमित ठाकरे महाविद्यालय परिसरात पोहोचताच विद्यार्थी व नागरिकांमध्ये प्रचंड उत्साह पाहायला मिळाला. मोठ्या संख्येने जमलेल्या विद्यार्थ्यांनी त्यांच्यासोबत फोटो आणि सेल्फी काढण्यासाठी गर्दी केली होती. कार्यक्रमापूर्वी अमित ठाकरे यांनी विरारच्या न्यू विवा कॉलेज परिसरामध्ये 'मनसे विद्यार्थी सेना स्टँड'चे अधिकृत उद्घाटन केले. यानंतर त्यांनी वसई-विरार शहर महापालिकेचे महापौर अजीव पाटील आणि माजी आमदार क्षितीज ठाकूर यांची सदिच्छा भेट घेतली.

यादरम्यान उपस्थितांशी व माध्यमांशी बोलताना अमित ठाकरे यांनी आजच्या तरुण पिढीच्या जागरूकतेचे आणि संघटित होण्याचे मोकळेपणाने कौतुक केले. दिल्लीत आंदोलक विद्यार्थ्यांवर लाठीमार करण्यात आला, मात्र महाराष्ट्र सरकारने या गंभीर विषयावर केंद्र सरकारला अद्याप कोणताही जाब विचारलेला नाही असे त्यांनी स्पष्ट केले.

आजची तरुण पिढी खूप विचारपूर्वक पावले उचलत आहे. गेल्या दोन ते अडीच महिन्यांतील घडामोडींवरून आम्हाला या तरुणांकडूनच प्रेरणा आणि शिकवण मिळाली आहे. त्यामुळे त्यांना वेगळा सल्ला किंवा सूचना देण्याची अजिबात गरज नाही ते जे करत आहेत, ते अगदी योग्य आहे, असेही त्यांनी सांगितले. संकटाच्या काळात राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्यासारखे नेतृत्व तरुणांच्या पाठीशी ठामपणे उभे राहिल्यामुळेच आजच्या तरुण पिढीचा त्यांच्यावर दृढ विश्वास, प्रेम आणि आदर आहे, असेही अमित ठाकरे यांनी स्पष्ट केले.

# महापौर रितू तावडेंच्या पतीबाबत युट्यूबवर खोटी माहिती; फोटोग्राफरची पोलिसांत तक्रार

**मुंबई (प्रतिनिधी) :** मुंबई महापालिकेच्या महापौर रितू तावडे यांच्या वैयक्तिक आयुष्याविषयी चुकीची माहिती देणाऱ्या अज्ञाताविरोधात काळाचौकी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. इंडियन एक्स्प्रेसने यासंदर्भातील वृत्त दिलं आहे.

**नेमकं काय घडलं?**

लालबाग येथील रहिवासी असलेल्या ५५ वर्षीय राजेश वासुदेव तावडे यांनी काळाचौकी पोलिसांत तक्रार दिली आहे. ते कणकवली येथे फोटोग्राफीचे वर्ग आणि एक स्टुडिओ चालवतात. त्यांचं एक युट्युब चॅनेल आणि फेसबुक अकाउंट देखील आहे. यावर ते त्यांच्या फोटोग्राफी क्लासच्या जाहिराती आणि फोटो पोस्ट



करत असतात. त्यांनी केलेल्या तक्रारीनुसार, २६ ऑगस्ट रोजी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास त्यांच्या इमारतीत राहणाऱ्या एका महिलेने त्यांना व्हॉट्सॲपवर एक युट्युब शॉर्ट्सची लिंक पाठवली. त्यांनी ती लिंक उघडली असता, त्यांना 'gk-shorts-videos' नावाच्या चॅनेलवर एक छोटा व्हिडिओ आढळला. या व्हिडिओचं शीर्षक 'Ritu Tawade ke pati Rajesh Tawade ka jeevan parichay' (रितू तावडे यांचे पती राजेश तावडे यांचा जीवन परिचय) असं होतं.

२३ ऑगस्ट रोजी पोस्ट करण्यात आलेल्या या व्हिडिओमध्ये तक्रारदा cqर म्हणजेच राजेश तावडे यांचा फोटो महापौर रितू तावडे यांच्या फोटोशेजारी लावून, त्यांचा उल्लेख महापौरांचे पती म्हणून करण्यात आला होता. तक्रारदाराला संशय आहे की, त्यांचा फोटो त्यांच्या फेसबूक अकाउंटवरून घेण्यात आला असावा, तर महापौरांचा फोटो सोशल मीडियावरून मिळवला असावा. प्राथमिक माहिती अहवालात (FIR) नमूद केल्यानुसार, तक्रारदाराने संबंधित युट्युब चॅनेल तपासले असता ते १५ एप्रिल रोजी तयार करण्यात आल्याचे समोर आले. या चॅनेलचे सुमारे १,५३० सब्सक्राइबर्स असून त्यावर राजकीय नेते आणि चित्रपट क्षेत्रातील व्यक्तींच्या परिचयाचे २४३ व्हिडिओ आहेत.

पोलिसांनी सांगितलं की, "हा चॅनल निर्माता राजकीय नेत्यांच्या जीवनाबद्दल माहिती देणारे व्हिडिओ तयार करतो, असं तक्रारदाराने नमूद केलं आहे." कोणतीही शहानिशा न करता आपली आणि महापौरांची बदनामी करण्याच्या उद्देशाने हा व्हिडिओ बनवून तो प्रसारित करण्यात आल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. "आम्ही याप्रकरणी एफआयआर दाखल केला असून पुढील तपास करत आहोत", असं पोलिसांनी सांगितलं.

# भटक्या-विमुक्तांच्या मुक्तीपासून सन्मानाच्या वाटचालीपर्यंत

**३१ ऑगस्ट हा दिवस भटके-विमुक्त समाजाच्या इतिहासातील अत्यंत महत्त्वाचा आणि भावनिक दिवस आहे. हा केवळ एखादा स्मृतिदिन नाही, तर अन्याय, कलंक, उपेक्षा आणि सामाजिक बहिष्काराच्या दीर्घ इतिहासातून स्वाभिमान, समानता आणि मानवी प्रतिष्ठेकडे वाटचाल करण्याचे प्रतीक आहे. महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस 'भटके विमुक्त दिवस' म्हणून साजरा करण्यास २०२५ मध्ये अधिकृत मान्यता दिली. त्यामुळे हा दिवस साजरा करताना केवळ औपचारिक कार्यक्रम न करता भटके-विमुक्त समाजाच्या ऐतिहासिक वेदना, वर्तमानातील प्रश्न आणि भविष्यातील संधी यांचा गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.**



भारतीय समाजरचनेत भटक्या आणि विमुक्त जमातींचे स्थान वैशिष्ट्यपूर्ण आहे. उपजीविकेच्या पारंपरिक साधनांनुसार, जीवनपद्धतीनुसार आणि भौगोलिक परिस्थितीनुसार अनेक समूहांनी भटकंतीचे जीवन स्वीकारले. काही समूह पारंपरिक कला, लोककला, पशुपालन, हस्तकला, मनोरंजनाचे विविध प्रकार, औषधी वनस्पतींचे ज्ञान, लघु व्यापार, लोहारकाम, दगडकाम, बांधकामाशी संबंधित कौशल्ये किंवा इतर पारंपरिक व्यवसायांवर अवलंबून होते. स्थिर गावव्यवस्थेच्या चौकटीबाहेर राहणाऱ्या या समूहांनी आपल्या ज्ञानाच्या आणि कौशल्याच्या बळावर समाजजीवनात महत्त्वाचे योगदान दिले. मात्र स्थिर वस्ती, जमीन आणि पारंपरिक सामाजिक संस्थांच्या अभावामुळे त्यांना सामाजिक सुरक्षेपासून आणि संस्थात्मक संधींपासून मोठ्या प्रमाणावर वंचित राहावे लागले.

भटके आणि विमुक्त या संज्ञांमध्ये सूक्ष्म फरक आहे. भटक्या जमातींच्या जीवनपद्धतीत स्थलांतर आणि भटकंतीला विशेष महत्त्व असते; तर 'विमुक्त' ही संज्ञा ब्रिटिश राजवटीत 'गुन्हेगार जमाती' म्हणून कलंकित करण्यात आलेल्या आणि नंतर त्या कायदेशीर कलंकातून मुक्त झालेल्या समुदायांसाठी वापरली जाते. महाराष्ट्रातील भटक्या-विमुक्त समाजात अनेक विविध जाती-जमातींचा समावेश होतो. या विविध समूहांची सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक परिस्थिती एकसारखी नसली तरी ऐतिहासिक उपेक्षा आणि सामाजिक कलंकाचा अनुभव अनेक समूहांना समानपणे सहन करावा लागला आहे.

या समाजाच्या इतिहासातील सर्वांत काळा अध्याय म्हणजे ब्रिटिशांनी लागू केलेला 'क्रिमिनल ट्राइब्ज अ‍ॅक्ट' होय. १८७१ मध्ये करण्यात आलेल्या या कायद्यामुळे काही संपूर्ण जाती-जमातींना त्यांच्या वैयक्तिक कृतीवर नव्हे, तर केवळ जातीय ओळखीच्या आधारे 'गुन्हेगार' म्हणून नोंदविण्याची अमानुष व्यवस्था निर्माण झाली. म्हणजेच एखाद्या व्यक्तीने गुन्हा केला किंवा नाही, यापेक्षा ती व्यक्ती कोणत्या समुदायात जन्माला आली आहे, याला अधिक महत्त्व देण्यात आले. हा आधुनिक न्यायव्यवस्थेच्या मूलभूत तत्त्वांनाच छेद देणारा प्रकार होता.

या कायद्यामुळे संपूर्ण समुदायांवर संशयाची छाया पडली. त्यांच्या हालचालींवर नियंत्रण ठेवण्यात आले, नोंदणी आणि देखरेखीच्या विविध यंत्रणा उभ्या करण्यात आल्या आणि अनेकांना तथाकथित 'सेटलमेंट'मध्ये ठेवण्यात आले. त्यांच्या स्वातंत्र्यावर आणि उपजीविकेच्या पारंपरिक मार्गांवर निर्बंध आले. परिणामी सामाजिक कलंक, आर्थिक दारिद्र्य आणि प्रशासकीय नियंत्रण यांचे दुष्टचक्र निर्माण झाले. सर्वांत वेदनादायक बाब म्हणजे 'गुन्हेगार' हा शिक्का व्यक्तीच्या कृतीशी जोडलेला नसून जन्माशी जोडला गेला. अशा प्रकारची जन्मजात गुन्हेगारीची कल्पना मानवी प्रतिष्ठेला नाकारणारी होती.

भारतीय स्वातंत्र्यलढ्याच्या व्यापक इतिहासातही या समुदायांचे योगदान अनेकदा पुरेसे अधोरेखित झालेले दिसत नाही. ब्रिटिश सत्तेविरुद्ध विविध स्वरूपात प्रतिकार करणाऱ्या अनेक स्थानिक समुदायांवर ब्रिटिश प्रशासनाने कठोर नियंत्रण ठेवले. भटक्या-विमुक्त समाजातील विविध समूहांच्या इतिहासात स्वातंत्र्य, स्वाभिमान आणि अस्तित्वासाठी संघर्षाची अनेक उदाहरणे आहेत. म्हणूनच या समाजाचा इतिहास केवळ दारिद्र्याचा किंवा मागासलेपणाचा इतिहास म्हणून पाहणे चुकीचे ठरेल. तो प्रतिकाराचा, जिद्दीचा, सांस्कृतिक सातत्याचा आणि अस्तित्व टिकवून ठेवण्याच्या संघर्षाचा इतिहास आहे.

स्वातंत्र्यानंतर भारतीय लोकशाहीसमोर या ऐतिहासिक अन्यायाचे निराकरण करण्याचे आव्हान होते. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी ब्रिटिशकालीन 'क्रिमिनल ट्राइब्ज अ‍ॅक्ट-१८७१' रद्द करण्यात आला आणि त्या कायद्याच्या कक्षेत असलेल्या समुदायांना 'विमुक्त' म्हणून ओळख मिळाली. त्यामुळे ३१ ऑगस्ट हा दिवस या समाजाच्या दृष्टीने एका ऐतिहासिक बंधनातून मुक्ततेचे प्रतीक ठरला.

मात्र कायदा रद्द झाला म्हणून सामाजिक कलंक तात्काळ संपला नाही. कायद्याच्या पुस्तकातील 'गुन्हेगार' हा शब्द काढून टाकणे सोपे होते; पण समाजाच्या मानसिकतेतील संशय आणि पूर्वग्रह दूर करणे अधिक कठीण होते. अनेक दशकांनंतरही भटक्या-विमुक्त समाजातील काही घटकांना पोलिसी संशय, सामाजिक अविश्वास आणि भेदभावाचा सामना करावा लागल्याचे सामाजिक अभ्यासांतून आणि विविध अनुभवांतून दिसून येते. एका अन्यायकारक कायद्याने निर्माण केलेली मानसिकता पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचते, याची ही जाणीव करून देणारी बाब आहे.

भटक्या-विमुक्त समाजाच्या वर्तमान प्रश्नांकडे पाहिले तर शिक्षण हा सर्वांत महत्त्वाचा प्रश्न आहे. स्थिर निवासाचा अभाव, वारंवार स्थलांतर, आर्थिक अस्थिरता, शाळेपासून भौगोलिक अंतर आणि कागदपत्रांची कमतरता यामुळे अनेक मुलांना सातत्याने शिक्षण घेणे कठीण जाते. एखादे मूल शाळेत दाखल झाले तरी कुटुंबाच्या स्थलांतरामुळे त्याचे शिक्षण खंडित होऊ शकते. त्यामुळे केवळ शाळेत प्रवेश देणे पुरेसे नाही; शिक्षणाची सातत्यपूर्णता, वसतिगृहांची उपलब्धता, शिष्यवृत्ती, शैक्षणिक मार्गदर्शन आणि कुटुंबाच्या आर्थिक स्थैर्याशी जोडलेली उपाययोजना आवश्यक आहे.

शिक्षणाबरोबरच निवासाचा प्रश्न अत्यंत गंभीर आहे. स्थिर घर हे केवळ निवाऱ्याचे साधन नसून शिक्षण, आरोग्य, मतदानाचा हक्क, सरकारी योजना, बँकिंग, रोजगार आणि सामाजिक सुरक्षितता यांच्याशी जोडलेले असते. ज्यांच्याकडे स्थिर पत्ता नाही, त्यांच्यासाठी अनेक शासकीय प्रक्रियाच कठीण होतात. जन्मनोंदणी, जात प्रमाणपत्र, रहिवासी दाखला, आधारसारखी ओळखपत्रे, शिधापत्रिका आणि इतर कागदपत्रे मिळविण्याच्या प्रक्रियेत येणाऱ्या अडचणींमुळे योजनांचा लाभ प्रत्यक्ष लाभार्थ्यांपर्यंत पोहोचण्यात अडथळे निर्माण होतात. त्यामुळे 'कागदपत्रे' हा केवळ प्रशासकीय विषय नसून सामाजिक समावेशनाचा मूलभूत प्रश्न आहे.

रोजगाराच्या बाबतीतही भटक्या-विमुक्त समाजासमोर मोठी आव्हाने आहेत. पारंपरिक व्यवसायांमध्ये आधुनिक बाजारपेठेतील बदलांमुळे उत्पन्नाच्या संधी कमी झाल्या आहेत. अनेक पारंपरिक कला आणि कौशल्ये आधुनिक अर्थव्यवस्थेशी जोडली गेली नाहीत तर ती पुढील पिढ्यांपर्यंत टिकणे कठीण होईल. त्यामुळे पारंपरिक कौशल्यांचे जतन करताना त्यांचे आधुनिक कौशल्यविकास, बाजारपेठ, डिजिटल माध्यमे, सहकारी संस्था आणि उद्योजकतेशी नाते जोडणे आवश्यक आहे. समाजातील युवकांना कौशल्याधारित प्रशिक्षण, रोजगाराभिमुख शिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या तर आर्थिक स्वावलंबनाचा मार्ग अधिक व्यापक होऊ शकतो.

महिलांच्या प्रश्नांकडेही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. भटक्या-विमुक्त समाजातील महिलांना गरिबी, अस्थिर उपजीविका, शिक्षणाचा अभाव, आरोग्यविषयक अडचणी आणि सामाजिक असुरक्षितता अशा अनेक प्रश्नांना सामोरे जावे लागू शकते. महिलांच्या शिक्षणाला प्राधान्य, स्वयं-सहायता गटांची निर्मिती, कौशल्यविकास, आर्थिक साक्षरता, सुरक्षित निवास आणि आरोग्यसेवा यांना विकासाच्या केंद्रस्थानी ठेवणे आवश्यक आहे. एखाद्या समाजाचा खरा विकास मोजायचा असेल तर त्या समाजातील महिलांची स्थिती आणि मुलींच्या शिक्षणाच्या संधी यांचा विचार करणे अपरिहार्य आहे.

भटके-विमुक्त समाजाच्या सांस्कृतिक संपदेचाही गांभीर्याने विचार झाला पाहिजे. लोककला, लोकपरंपरा, मौखिक इतिहास, लोकसंगीत, कथाकथन, हस्तकला, पारंपरिक ज्ञान आणि जीवनपद्धती ही भारतीय सांस्कृतिक विविधतेची महत्त्वपूर्ण अंग आहेत. आधुनिकतेच्या प्रवाहात या परंपरा नष्ट होऊ नयेत, यासाठी त्यांचे दस्तऐवजीकरण आणि संवर्धन आवश्यक आहे. मात्र संस्कृतीचे संवर्धन करताना त्या समाजाला केवळ 'लोककलेचे प्रदर्शन' म्हणून पाहणे टाळले पाहिजे. त्यांच्या संस्कृतीचा आदर करण्याबरोबरच त्यांच्या शिक्षण, रोजगार, आरोग्य, निवास आणि सामाजिक न्यायाच्या प्रश्नांनाही समान महत्त्व दिले पाहिजे.

आज संविधानिक मूल्ये भटके-विमुक्त समाजाच्या प्रश्नांकडे पाहण्यासाठी आपल्याला महत्त्वाची दिशा देतात. भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला समानता, स्वातंत्र्य आणि न्यायाची हमी दिली आहे. त्यामुळे जन्म, जात, जीवनपद्धती किंवा सामाजिक पार्श्वभूमीच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीकडे संशयाने पाहणे संविधानाच्या समतेच्या भावनेला विरोध करणारे आहे. भटके-विमुक्त समाजाचा प्रश्न हा केवळ एखाद्या विशिष्ट समाजघटकाचा प्रश्न नसून भारतीय लोकशाहीच्या समावेशकतेची कसोटी आहे.

महाराष्ट्र शासनाने ३१ ऑगस्ट हा दिवस अधिकृतपणे 'भटके विमुक्त दिवस' म्हणून मान्य केल्यामुळे या प्रश्नांना नव्याने सामाजिक आणि प्रशासकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. परंतु कोणताही स्मृतिदिन तेव्हाच अर्थपूर्ण ठरतो, जेव्हा त्या निमित्ताने वास्तवातील प्रश्नांवर ठोस कृती होते. कार्यक्रम, भाषणे आणि गौरव सोहळे आवश्यक असले तरी त्यापलीकडे जाऊन शिक्षण, निवास, रोजगार, आरोग्य, कागदपत्रे आणि सामाजिक सुरक्षा या प्रश्नांवर परिणामकारक उपाययोजना होणे अधिक महत्त्वाचे आहे.

भटके-विमुक्त समाजाच्या विकासासाठी शासन, स्वयंसेवी संस्था, शैक्षणिक संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि समाजातील संवेदनशील घटक यांनी परस्पर सहकार्याने काम करण्याची गरज आहे. विद्यापीठे आणि संशोधन संस्थांनी या समाजाच्या इतिहासाचा, संस्कृतीचा, शिक्षणाचा, अर्थकारणाचा आणि सामाजिक बदलाचा शास्त्रीय अभ्यास वाढवला पाहिजे. त्यांच्याविषयी संशोधन करताना मात्र त्यांच्याकडे केवळ 'अभ्यासाचा विषय' म्हणून न पाहता त्यांच्या अनुभवांना आणि ज्ञानाला महत्त्व देणे आवश्यक आहे.

विशेषतः नव्या पिढीच्या युवकांना या समाजाच्या प्रश्नांशी जोडणे महत्त्वाचे आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या माध्यमातून शिक्षण, कौशल्यविकास, उद्योजकता आणि बाजारपेठेपर्यंत पोहोचण्याच्या नव्या संधी निर्माण झाल्या आहेत. योग्य प्रशिक्षण आणि मार्गदर्शन मिळाल्यास भटक्या-विमुक्त समाजातील युवक केवळ रोजगार शोधणारे नव्हे, तर रोजगार निर्माण करणारे उद्योजक बनू शकतात. पारंपरिक कौशल्यांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड दिल्यास सांस्कृतिक वारसा आणि आर्थिक विकास यांची सांगड घालता येऊ शकते.

३१ ऑगस्टचा भटके-विमुक्त दिन आपल्याला एक महत्त्वाचा प्रश्न विचारतो की कायदा बदलला, पण समाजाची मानसिकता कितपत बदलली? १९५२ मध्ये कायदेशीर मुक्ती मिळाली; परंतु खरी सामाजिक मुक्ती तेव्हाच पूर्ण होईल, जेव्हा कोणत्याही मुलाला त्याच्या जन्माच्या आधारावर कमी लेखले जाणार नाही, कोणत्याही कुटुंबाला केवळ त्याच्या भटक्या जीवनपद्धतीमुळे संशयाच्या नजरेने पाहिले जाणार नाही आणि कोणत्याही व्यक्तीला सामाजिक प्रतिष्ठेसाठी आपल्या पार्श्वभूमीचा पुरावा देत राहण्याची गरज भासणार नाही. कायद्याने दिलेली समानता समाजमानसात उतरली, तरच स्वातंत्र्याचा अर्थ खऱ्या अर्थाने व्यापक होईल.

आज भटके-विमुक्त समाजाकडे दयेच्या नजरेने पाहण्याची नव्हे, तर समानतेच्या आणि सन्मानाच्या नजरेने पाहण्याची गरज आहे. त्यांच्या प्रश्नांकडे केवळ कल्याणकारी योजनांच्या चौकटीतून न पाहता सामाजिक न्यायाच्या व्यापक चौकटीतून पाहिले पाहिजे. 'त्यांच्यासाठी काय करता येईल?' या प्रश्नाबरोबरच 'त्यांना निर्णयप्रक्रियेत सहभागी कसे करून घेता येईल?' हा प्रश्नही विचारला पाहिजे. त्यांच्या नेतृत्वाला, अनुभवांना आणि ज्ञानाला विकासाच्या प्रक्रियेत स्थान मिळाले पाहिजे.

३१ ऑगस्ट हा दिवस म्हणून साजरा करताना १९५२ च्या मुक्तीची आठवण ठेवणे आवश्यक आहे; परंतु त्याचबरोबर आजच्या पिढीसमोर उभ्या असलेल्या अदृश्य बंधनांचीही जाणीव ठेवली पाहिजे. शिक्षणाचा अभाव, भूमिहीनता, अस्थिर निवास, बेरोजगारी, कागदपत्रांचा प्रश्न, आरोग्याच्या सुविधा, सामाजिक पूर्वग्रह आणि आर्थिक असुरक्षितता ही आजची आव्हाने आहेत. या आव्हानांवर मात करण्यासाठी सातत्यपूर्ण आणि संवेदनशील धोरणांची आवश्यकता आहे.

खऱ्या अर्थाने भटके-विमुक्त दिन साजरा करायचा असेल तर त्या दिवशी केवळ इतिहासाचे स्मरण न करता भविष्याचा संकल्प करावा लागेल. प्रत्येक भटक्या-विमुक्त मुलाला दर्जेदार शिक्षण, प्रत्येक कुटुंबाला सन्मानजनक निवास, प्रत्येक युवकाला कौशल्य व रोजगाराची संधी, प्रत्येक महिलेला सुरक्षितता आणि आर्थिक स्वावलंबन, प्रत्येक नागरिकाला आवश्यक कागदपत्रे आणि प्रत्येक व्यक्तीला संविधानाने दिलेली समान प्रतिष्ठा मिळवून देण्याचा संकल्प करावा लागेल. हीच त्या ऐतिहासिक मुक्तीची खरी फलश्रुती ठरेल.

भटक्या-विमुक्त समाजाची कहाणी ही केवळ एका समाजाची कहाणी नाही; ती भारतीय लोकशाहीच्या सामाजिक न्यायाच्या प्रवासाची कहाणी आहे. ३१ ऑगस्ट १९५२ रोजी एका अन्यायकारक कायद्याची समाप्ती झाली; आता ३१ ऑगस्ट हा दिवस सामाजिक पूर्वग्रह, भेदभाव आणि वंचिततेच्या अदृश्य भिंती मोडण्याच्या नव्या संकल्पाचा दिवस झाला पाहिजे. कायद्याने दिलेली मुक्ती सामाजिक सन्मानात आणि आर्थिक स्वावलंबनात रूपांतरित झाली, तरच 'विमुक्त' ही संज्ञा केवळ इतिहासाची आठवण न राहता वर्तमानाची जिवंत वास्तवता बनेल. म्हणूनच भटके-विमुक्त दिनाचा संदेश स्पष्ट आहे की मुक्ती केवळ बंधनांतून बाहेर पडण्यात नाही; तर समान संधी, सन्मान, स्वाभिमान आणि न्यायासह समाजाच्या मुख्य प्रवाहात प्रतिष्ठेने उभे राहण्यात आहे.

**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**

# भारतीय राजकारणातील ऋषितुल्य व्यक्तिमत्त्व : प्रणव मुखर्जी

भारताचे माजी राष्ट्रपती, ज्येष्ठ राजकीय नेते, कुशल प्रशासक आणि संसदीय परंपरांचे गाढे अभ्यासक प्रणव मुखर्जी यांचा आज स्मृतिदिन. ३१ ऑगस्ट २०२० रोजी वयाच्या ८४व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील एक प्रदीर्घ पर्व संपले. सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांमध्ये समान आदराचे स्थान असलेले प्रणव मुखर्जी हे भारतीय राजकारणातील एक अजातशत्रू व्यक्तिमत्त्व म्हणून ओळखले जात

जवळपास पाच दशकांहून अधिक काळ त्यांनी सार्वजनिक जीवनात सक्रिय राहून भारतीय राजकारण, प्रशासन आणि संसदीय लोकशाहीला मोलाचे योगदान दिले. त्यांचे ज्ञान, अनुभव, संयमी स्वभाव, विलक्षण स्मरणशक्ती आणि विविध विषयांवरील सखोल अभ्यास यामुळे त्यांना भारतीय राजकारणातील 'चालती-बोलती लायब्ररी' असे संबोधले जात असे.

११ डिसेंबर १९३५ रोजी पश्चिम बंगालमधील बीरभूम जिल्ह्यातील मिराटी येथे प्रणव मुखर्जी यांचा जन्म झाला. त्यांचे वडील कामदा किंकर मुखर्जी हे स्वातंत्र्यसैनिक आणि काँग्रेसचे ज्येष्ठ कार्यकर्ते होते. त्यांनी ब्रिटिशांविरुद्धच्या स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग घेतला आणि कारावासही भोगला. त्यामुळे लहानपणापासूनच प्रणव मुखर्जी यांच्यावर देशभक्ती, सार्वजनिक सेवा आणि सामाजिक बांधिलकीचे संस्कार झाले.

प्रणव मुखर्जी यांनी कोलकाता विद्यापीठातून इतिहास आणि राज्यशास्त्र विषयांत पदव्युत्तर शिक्षण घेतले तसेच कायद्याची पदवी मिळवली. राजकारणात येण्यापूर्वी त्यांनी काही काळ अध्यापन केले आणि पत्रकारितेच्या क्षेत्रातही काम केले. मात्र त्यांच्या मनात सार्वजनिक जीवनाची ओढ होती. १९६९ मध्ये त्यांनी सक्रिय राजकारणात प्रवेश केला आणि अल्पावधीतच आपल्या बुद्धिमत्ता, अभ्यासू वृत्ती, वक्तृत्व आणि संघटनकौशल्याच्या जोरावर राष्ट्रीय राजकारणात आपली वेगळी ओळख निर्माण केली.

राज्यसभेचे सदस्य म्हणून त्यांच्या संसदीय कारकिर्दीची सुरुवात झाली. पुढे त्यांनी केंद्र सरकारमध्ये अनेक महत्त्वाची खाती सांभाळली. अर्थमंत्री, संरक्षणमंत्री, परराष्ट्रमंत्री, वाणिज्यमंत्री अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी समर्थपणे पार पाडल्या. संसदीय कामकाजाचा प्रदीर्घ अनुभव आणि प्रशासनातील सखोल जाण यामुळे ते केंद्र सरकारमधील अत्यंत विश्वासार्ह नेत्यांपैकी एक बनले.



अर्थव्यवस्था, परराष्ट्र धोरण, संरक्षण, अंतर्गत सुरक्षा, संसदीय प्रक्रिया आणि घटनात्मक बाबी या विविध विषयांवर त्यांचे प्रभुत्व होते. संसदेतील विविध समित्यांच्या कामकाजातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. कोणत्याही विषयावर चर्चा करताना त्यांची तयारी, आकडेवारीवरील पकड आणि घटनात्मक तरतुदींचे ज्ञान पाहून अनेक जण प्रभावित होत असत.

प्रणव मुखर्जी यांचे वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ सत्ताधारी पक्षाचे नेते नव्हते. संसदीय लोकशाहीत विरोधी पक्षाचे महत्त्व त्यांना पूर्णपणे मान्य होते. त्यामुळे विविध पक्षांतील नेत्यांशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. मतभेद असले तरी मनभेद नसावेत, ही त्यांच्या राजकीय वर्तनाची शैली होती. म्हणूनच ते सत्ताधारी आणि विरोधी पक्षातील नेत्यांमध्ये समान आदराचे पात्र ठरले.२०१२ मध्ये प्रणव मुखर्जी भारताचे तेरावे राष्ट्रपती झाले. राष्ट्रपतीपदाची शपथ घेतल्यानंतर त्यांनी या सर्वोच्च घटनात्मक पदाची प्रतिष्ठा आणि गांभीर्य कायम राखले. राष्ट्रपती म्हणून त्यांनी संविधानाच्या चौकटीत राहून आपल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या. देशातील विविध विद्यापीठे, शैक्षणिक संस्था, युवक आणि विद्यार्थ्यांशी संवाद साधण्यावर त्यांनी विशेष भर दिला.

राष्ट्रपती भवन हे केवळ औपचारिक वास्तू न राहता लोकांशी संवाद साधणारे आणि ज्ञान-विचारांचे केंद्र व्हावे, यासाठीही त्यांनी अनेक उपक्रमांना प्रोत्साहन दिले. राष्ट्रपती म्हणून त्यांनी भारतीय लोकशाही, संविधान, शिक्षण आणि राष्ट्रीय एकात्मतेच्या मूल्यांवर सातत्याने भर दिला.

प्रणव मुखर्जी यांना २००८ मध्ये पद्मविभूषण आणि २०१९ मध्ये देशाचा सर्वोच्च नागरी सन्मान भारतरत्न प्रदान करण्यात आला. त्यांच्या दीर्घ सार्वजनिक जीवनाचा आणि राष्ट्रसेवेचा हा मोठा गौरव होता.

प्रणव मुखर्जी यांच्या व्यक्तिमत्त्वात राजकारणी, संसदपटू, प्रशासक, अभ्यासक आणि शिक्षक या सर्व भूमिका एकत्रित झाल्या होत्या. त्यांना इतिहासाची जाण होती, वर्तमानाची समज होती आणि भविष्यातील आव्हानांचा वेध घेण्याची दूरदृष्टी होती. संसदीय परंपरांचा त्यांनी केवळ अभ्यास केला नाही, तर त्या प्रत्यक्ष आचरणात आणल्या.

३१ ऑगस्ट २०२० रोजी दिल्ली येथे त्यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने भारतीय राजकारणातील एक अनुभवी, संयमी आणि विद्वान व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी सहज भरून निघणारी नाही.

आजच्या राजकारणात मतभेदांबरोबरच वैयक्तिक कटुता वाढताना दिसते. अशा काळात प्रणव मुखर्जी यांची राजकीय कारकीर्द अधिकच महत्त्वाची ठरते. अभ्यास, संयम, संवाद, संसदीय शिष्टाचार आणि लोकशाहीवरील निष्ठा या मूल्यांच्या आधारेही राजकारण करता येते, हे त्यांनी आपल्या दीर्घ सार्वजनिक जीवनातून सिद्ध केले.भारतीय राजकारणातील या ऋषितुल्य व्यक्तिमत्त्वाचे योगदान भारतीय लोकशाहीच्या इतिहासात सदैव स्मरणात राहील. त्यांच्या स्मृतिदिनी या महान संसदपटू, अभ्यासू राजकारणी आणि भारतरत्न प्रणव मुखर्जी यांना विनम्र अभिवादन!

**श्याम ठाणेदार**

# अर्थहीन भासे मज हा... टॉक्सिक : द फेअरी टेल ऑफ ग्रोन अप्स



रेश्मा राईकवार

दाक्षिणात्य चित्रपटात मुख्य कलाकाराच्या व्यक्तिमत्वाच्या अनुषंगाने कथा रचल्या जातात. त्यातही चित्रपटाचा सगळ्याच अर्थाने कर्ताकरविता तो कलाकार असेल तर कथाही त्याचीच आणि कौतुकही त्याच्याच वाट्याला येईल असा सगळा साज चित्रपटात असतो. ‘टॉक्सिक : द फेअरी टेल ऑफ ग्रोन अप्स’ या लांबलचक नावाने आलेला चित्रपटही असाच ‘यश’मय आहे. मुळात, या चित्रपटाची ‘कथा’ दिग्दर्शिका गीतू मोहनदास यांची आहे, त्यांचंच दिग्दर्शनही आहे त्यामुळे पुरुषांच्या या टोळीयुध्दात चांगल्या स्त्री पात्रांची रेलचेलही पाहायला मिळते. पण, कथेचा करविताही यशच आहे, त्याने त्याच्यासाठी त्याच्या पध्दतीने कथा लिहिली आहे. त्यामुळे एक रंजक कथाकल्पना असलेल्या चित्रपटात ॲक्शन आणि हिरोच्या नावाखाली घातलेला घोळ आणि चित्रपटाचा वेळ सगळंच ‘अर्थहीन’ भासे मज हा कलह पडद्यावरचा असा अनुभव ठरतो.

‘टॉक्सिक : द फेअरी टेल ऑफ ग्रोन अप्स’ हे पडद्यावर त्याचा मतितार्थ समजावण्याचा प्रयत्न करत येणारं शीर्षक आणि चित्रपटाची कथा यातला संबंध हाही वेगळाच जांगडगुत्ता आहे. १९४७ साली भारताच्या दृष्टीने घडलेल्या महत्त्वाच्या घटना आणि अनेकांच्या काळजात रुतून बसलेलं फाळणी नामक दाहक वास्तव हा सगळा इतिहास एका बाजूला सारून हा चित्रपट तेव्हाच्या गोव्यात पोहोचतो. तिथे अजूनही पोर्तुगीजांचं वास्तव्य आहे. उच्चभ्रू लोकांचे क्लब्स आहेत, तिथे बाई, बाटली आणि नशा हाच धिंगाणा चालतो. आता हे चित्रपटाचं वेगळेपण असू शकतं. तर गोव्यात पोर्तुगीजांच्या आशिर्वादाने अंमली पदार्थ आणि त्या बळावर उभं राहिलेलं गुंडांचं साम्राज्य राजरोस पोसलं जातं आहे. हे साम्राज्य आपल्या कवेत घ्यायचं तर मग त्याचा म्होरक्या आपल्या बाजूने हवा. मग नाही म्हटलं तरी ‘गॉडफादर’ सदृश अनेक पाश्चिमात्य टोळीपटांमध्ये जो सत्तासंघर्ष आहे, तसाच भाग आपल्याला पाहायला मिळतो. हा नवा संघर्ष करणारे दोघं बहीणभाऊ आहेत राया आणि गंगा. हे दोघं रक्तरंजित खेळ खेळतायेत, ते मनापासून नाही. मग त्यांचा अतिशय दुर्दैवी, क्रूर असा भूतकाळ आहे. त्याच्याच खाणाखुणा मनावर घेऊन वावरणारा ‘राया’ हा अतिशय बेफिकीर, खेळात बंदूक चालवावी तसा हत्यार उचलत मुडदे पाडणारा, मुर्दाड मनाचा, प्रचंड भोगवादी माणूस. गंगानेच आजवर त्याचं रक्षण केलं आहे, त्यामुळे तिचा शब्द म्हणजे परवली मानणारा नायक वरून कितीही दुष्ट वाटत असला तरी छे... आतून तो तसा मुळीच नाही. तर सत्तेचा खेळ अर्थात म्होरक्याच्या मुलीशी लग्न करून जिंकणार... तोच त्याच्या आयुष्यात नादिया नामक तरुणीचा प्रवेश होतो. इथे मात्र त्याचं काठिण्य गळून पडतं, तो खरंच तिच्या प्रेमात पडतो, पण मग पुन्हा नियती आपले डाव टाकते.

एका क्षणात सगळं गमावून बसलेला राया फक्त आपला राग आणि त्या बळावर मिळवलेली सत्ता, नशा तेवढी वाढवत जगत राहतो. १९४७ ते पुढची वीस वर्ष असा कथेचा परीघ आहे. त्या काळात राया गोवा पार करून मकाऊपर्यंत आपली दहशत वाढवतो, कटू इतिहास गिळून गोव्यात परततो आणि पुन्हा कुणीतरी खरं प्रेम घेऊन त्याच्यापर्यंत पोहोचतं. मग एक वेगळाच कथाध्याय सुरू होतो, जो बापलेकातील संघर्षाचा आहे. आणि खरं म्हटलं तर हे नाट्यमय वळण थोडं रंजक आहे. नवं नसलं तरी आधीच्या त्याच त्याच टोळीयुध्द नाट्यापेक्षा वेगळं आहे. ते पाहताना मन प्रसन्न होतं असं नाही, उलट आत्तापर्यंत एकच विष ओकत होता, नंतरची दुहेरी मात्रा पोटात कळ उमटवतेच. असो, नंतर एक आणखी धक्कातंत्र वापरलं गेलं आहे जे काही प्रमाणात आहे... या जगात तर्काला थोडी का होईना जागा आहे, असा क्षणिक दिलासा देणारं आहे. तर कथेचा पैसच इतका मोठा आणि गुंतागुंतीचा करून टाकला आहे की कितीही वेगाने गोष्ट पुढे सरकली तरी बंदूका आणि गोळ्यांचा दणदणाट, रक्ताच्या चिळकांड्या... हे पचवत पचवत प्रेक्षक तिथल्या तिथे गोल फिरत राहतात. यशला बोलायचं काम अगदीच मोजकं आहे. स्टाईलमध्ये राहणं, वावरणं, मारणं, मध्येच कपडे उतरवणं, समोरच्या नायिकेला आव्हान देणं हे असं त्याचं काम आखीव रेखीव पध्दतीने डिझाईन केलं गेलं आहे. या चित्रपटाचा बऱ्यापैकी जमून आलेला भाग हा अर्थात कियारा अडवाणीची नादिया आणि राया यांच्यातली प्रेमकथा. कियारा अडवाणीची नादिया दिसायलाही अत्यंत सुरेख, नाजूक आहे आणि तितकीच जिद्दी, हळवी, समरसून जगणारी. ट्रेलर पाहिल्यानंतर खरंतर तिने ही भूमिका का केली असेल? असा प्रश्न पडला होता. मात्र, तिची नादिया उत्तम जमून आली आहे. या चित्रपटातली स्त्री पात्रं उल्लेखनीय आहेत. नयनताराने साकारलेली गंगा, तारा सुतारियाची रिबेका आणि रुक्मिणी वसंतची मेलिसा तिन्ही व्यक्तिरेखा चांगल्या आहेत. मात्र, विशेष लक्ष वेधून घेतात त्या नादिया आणि हुमा कुरेशीने साकारलेली एलिझाबेथ. अर्थात, ही पात्रं कितीही छान असली तरी ती यशच्या रायामुळे झाकोळली गेली आहेत.

स्थळकाळाचं सुटणारं भान आणि पूर्ण व्हीएफएक्सच्या मदतीने उभं केलेलं आणि सतत नाटकाच्या सेटवर आहोत असं वाटायला लावणारं गोव्याचं चित्रण हा आणखी त्रास देणारा भाग. कधी गोवा... कधी बर्फाळ प्रदेश... नेमकं काय सुरू आहे कळत नाही. ॲक्शनदृश्ये ही फार वाखाणण्याजोगी आहेत, हाही भाग नाही. संपूर्ण चित्रपट एका पध्दतीने स्टाईल करून त्याची मांडणी झाली आहे. पण, त्यामुळेच त्यात सतत कृत्रिमपणा जाणवत राहतो. यशला अभिनय करायची संधी संपूर्ण चित्रपटात नाही. उत्तरार्धात काही भाग तो लक्ष वेधून घेतो, जिथे तो तरुण वयात वावरताना दिसतो. त्यासाठी घेतलेली मेहनत दिसून येते. पण, माणूस ‘टॉक्सिक’ आहे म्हणायचं आणि खटाटोप मात्र तो मुळात तसा नाही हे दाखवायचा... या विरोधाभासातच झुलत राहिलेला हा चित्रपट म्हणूनच काही मोजक्या ठिकाणी रंजक वाटला तरी तो ‘अर्थहीन’च ठरतो.

**दिग्दर्शक** – गीतू मोहनदास

**कलाकार** – यश, नयनतारा, तारा सुतारिया, कियारा अडवाणी, हुमा कुरेशी, अक्षय ओबेरॉय, रुक्मिणी वसंत, संजिदा शेख.



# बादशाहच्या रॅपचा ‘चिमणा’वर भन्नाट तडका

वेगळा आशय, ग्रामीण संस्कृतीशी जोडलेली कथा आणि प्रभावी मांडणी यामुळे ‘गोंधळ’ या चित्रपटाने सुरुवातीपासूनच प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले आहे. देश-विदेशातील विविध चित्रपट महोत्सवांमध्ये चित्रपटाला मिळालेला प्रतिसाद, उत्कृष्ट दिग्दर्शन, प्रभावी सिनेमॅटोग्राफी आणि दमदार कथानकासाठी मिळालेले पुरस्कार यामुळे ‘गोंधळ’ने आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आता या चित्रपटातील एक पारंपरिक लोकगीत थेट जागतिक स्तरावर पोहोचले आहे. ‘गोंधळ’मधील ‘एक चिमणा चिवचिवला’ या रॉ आणि अस्सल लोकगीताला लोकप्रिय रॅपर बादशाहने आपल्या खास रॅपचा तडका देत नवे रूप दिले असून नुकतेच प्रदर्शित झालेले हे गाणे रसिकांच्या पसंतीस उतरत आहे. विशेष म्हणजे हे गाणं सध्या ट्रेंडिंगमध्ये आहे.




‘चिमणा’ या नावाने प्रदर्शित झालेल्या या गाण्यात दिव्या कुमार, बादशाह, नागेश मोर्वेकर आणि नेहा खान यांच्यावर हे गाणे चित्रित करण्यात आले आहे. पारंपरिक लोकसंगीताचा बाज कायम ठेवत त्याला आधुनिक रॅप आणि दमदार बीट्सची जोड देण्यात आली आहे. त्यामुळे या गाण्याचे पारंपरिक रूप आणि आधुनिक सादरीकरण यांचा भन्नाट मेळ साधला गेला आहे. ऐकताना आणि पाहातानाही हे गाणे एक वेगळाच अनुभव देत असून प्रदर्शित होताच त्याला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

विशेष म्हणजे, ‘एक चिमणा चिवचिवला’ हे ‘गोंधळ’मधील पारंपरिक लोकगीत असून, बादशाहने त्याला आपल्या शैलीत रॅपच्या माध्यमातून नव्या पिढीपर्यंत आणि जागतिक प्रेक्षकांपर्यंत पोहोचवले आहे.

# घोडेस्वारीचा सीन पडला महागात; महिमा म्हात्रेच्या नाकाला गंभीर दुखापत

‘तुला जपणार आहे’ या झी मराठीच्या थ्रिलर मालिकेत लोकप्रिय अभिनेत्री महिमा म्हात्रे प्रमुख भूमिका साकारत आहे. गेल्या काही महिन्यांपासून प्रेक्षकांची लाडकी मीरा ( मालिकेतील नाव ) नाकावर पट्टी लावून शूट करत असल्याचं पाहायला मिळत आहे. महिमाला नेमकं काय झालंय? याबद्दल चाहते कायम तिला कमेंट्समध्ये विचारत असतात. या गोष्टीला आता ८ महिने झालेले आहेत. युट्यूबवर एक व्हिडीओ शेअर करत अखेर महिमाने या सगळ्या गोष्टींचं स्पष्टीकरण दिलेलं आहे. यावेळी तिला अश्रू अनावर झाले होते. सेटवर अचानक अपघात झाल्याने मीराला ही दुखापत झाली होती.

महिमा म्हात्रे म्हणते, “गेले काही महिने मी नाकावर अन् कपाळाला पट्टी लावून शूटिंग करतेय. सगळेच मला विचारत आहेत, नेमकं काय झालं होतं आणि इतके महिने तुम्ही पट्टी लावून का शूट करताय? त्या सगळ्या प्रश्नांची उत्तरं आज मी तुम्हाला देणार आहे. मध्यंतरी मी मालिकेत दिसत नव्हते... तेव्हा सुद्धा प्रेक्षकांनी मला खूप मनापासून मिस केलं, तशा कमेंट्स केल्या. माझ्या सगळ्या चाहत्यांसाठी आज एक आनंदाची बातमी आहे कारण, आज मी ही नाकावरची पट्टी काढतेय. इतके दिवस तुम्ही सगळे प्रश्न विचारत होतात आणि मला कोणालाही उत्तरं देता येत नव्हती पण, आज इतक्या दिवसांनी मी ही पट्टी काढलीये आणि आता लवकरच तुम्हाला एपिसोडमध्येही मी जशी आहे तशीच तुम्हाला दिसेनच!”



मीरा पुढे म्हणाली, “मालिकेत मीरा खूप धाडसी दाखवण्यात आलेली आहे. त्यामुळे पहिल्या प्रोमोपासून आतापर्यंत सगळ्या प्रकारचे शूटिंग सीक्वेन्स मी केलेले आहेत. असाच एक सीन होता..मीरा अथर्वचा जीव वाचवण्यासाठी घोड्यावर स्वार होऊन त्याला हॉस्पिटलमध्ये घेऊन जाते. या सीनसाठी आम्ही सगळेच खूप उत्सुक होतो. एका मैदानात हे शूटिंग पार पडणार होतं...आम्ही दोन-तीन शॉट शूट सुद्धा केले, सगळं छान सुरू होतं. पण, शेवटच्या सीनच्यावेळी घोडा खूप वेगाने धावत होता...मीरा अथर्व दोघंही घोड्यावर होते, शॉट कट होताना घोडा उधळला. त्या क्षणाला मला काहीच समजलं नाही. मी घोड्याला कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला, लगाम खेचला पण, काही केल्या तो घोडा कंट्रोल होत नव्हता. शेवटी आम्ही दोघंही पडलो. सगळेजण लगेच धावत आले...सुरुवातीला आम्हाला वाटलं की इतकं काहीच झालेलं नाहीये. पण, तेव्हा सेटवर शांतता होती... अचानक नाकावर रक्ताची धार लागली. त्याक्षणी मला जाणवलं काहीतरी मेजर झालंय. मला लगेच हॉस्पिटलला सुद्धा नेलं. तेव्हा मला समजलं की, खूप लागलंय...मला संपूर्ण माझं आयुष्य डोळ्यासमोर दिसत होतं. माझे सगळे कुटुंबीय हॉस्पिटलला आले.”

पुढे अभिनेत्री सांगते, “मी तेव्हा दोन-तीन दिवस हॉस्पिटलमध्येच होते. नंतर डॉक्टरांनी विश्रांतीचा सल्ला दिला. त्यानंतर मी काही दिवस शूटिंगमध्ये नव्हते. त्यानंतर मी एवढे दिवस ट्रिटमेंट घेत होते...म्हणून ती पट्टी होती. मला प्रोडक्शन हाऊसने सुद्धा खूप पाठिंबा दिला. हा अपघात झाल्यावर पुन्हा एकदा उठून उभी राहिले आणि शूटिंगला गेले. हा अपघात झाल्यावर सुद्धा मी सात-आठ दिवसांनी पुन्हा सेटवर गेले आणि शूट सुरू केलं. पट्टी लावून का होईना मी काम केलं. माझी औषधं सुरू होती, ट्रिटमेंट सुरू होती. हे सगळं प्रेक्षकांच्या प्रेमामुळे, माझ्या कुटुंबीयांमुळे आणि प्रोडक्शनच्या पाठिंब्यामुळे शक्य झालं.”

“अपघात झाल्यावर चेहऱ्यावर एक व्रण आला होता..त्यामुळे तो डाग अजून डार्क होऊ नये, तसेच सूर्यप्रकाश त्याला लागू नये यासाठी मी काळजीने ती पट्टी नाकावर लावत होते. जर पट्टी काढली असती, तर गोष्टी अजून बिघडल्या असत्या. हे जितकं सोपं वाटतंय तितकं नक्कीच नव्हतं. तुम्ही मला खरंच सपोर्ट केलात त्यासाठी मनापासून थँक्यू! तुम्हा सगळ्यांमुळे मला खूप आधार मिळाला.” असं सांगत महिमाने सर्वांचे आभार मानले आहेत.

# छातीतील कफ सैल करण्यासाठी घरच्या घरी करा ‘हे’ उपाय

आयुर्वेदानुसार शरीरातील वात, पित्त आणि कफ हे तीन दोष शरीराच्या विविध कार्यांमध्ये महत्त्वाची भूमिका बजावतात. वाताचा संबंध हालचाल आणि मज्जासंस्थेच्या कार्याशी, पित्ताचा पचन व चयापचयाशी, तर कफाचा शरीराची स्थिरता, स्निग्धता आणि बळाशी जोडला जातो. या तिन्ही दोषांचे संतुलन आरोग्यासाठी महत्त्वाचे मानले जाते. आहारातील चुकीच्या सवयी, अनियमित दिनचर्या, झोपेचा अभाव आणि ताणतणाव यामुळे शरीरातील हे संतुलन बिघडल्याची लक्षणे जाणवू शकतात. त्यामुळे पौष्टिक आहार, नियमित व्यायाम, पुरेशी झोप आणि शिस्तबद्ध जीवनशैली राखणे आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे.

शरीरात कफ वाढल्यास घशात कफ साचल्यासारखी समस्या जाणवू शकते. विशेषतः सर्दी, व्हायरल संसर्ग, ॲलर्जी



किंवा हवामानातील बदलांमुळे नाक व श्वसनमार्गात श्लेष्मा वाढू शकतो. त्यामुळे नाक बंद होणे, घशात कफ जाणवणे, वारंवार घसा खाकरणे किंवा खोकला येणे अशी लक्षणे दिसू शकतात.

लहान मुलांमध्ये सर्दी, ॲलर्जी आणि श्वसनमार्गातील संसर्गाचे प्रमाण तुलनेने जास्त असल्यामुळे नाक बंद होणे, खोकला आणि बलगमाची समस्या वारंवार दिसून येऊ शकते. बदलते हवामान, धूळ-धूर, परागकण किंवा इतर ॲलर्जी निर्माण करणारे घटक यामुळेही मुलांना कफ साचल्यासारखे वाटू शकते. छातीला चिकटलेला कफ सैल करण्यासाठी काही सोपे घरगुती उपाय मदत करू शकतात.

**छातीतील चिकट कफ कमी करण्यासाठी घरगुती उपाय**

**कोमट पाणी प्या**

दिवसभर थोडे-थोडे कोमट पाणी प्यायल्याने शरीर हायड्रेट राहते आणि घट्ट कफ काही प्रमाणात पातळ होण्यास मदत होते.

**वाफ घ्या**

साध्या गरम पाण्याची वाफ काही मिनिटे घेतल्याने नाक-घसा ओलसर होऊन कफ सैल वाटू शकतो. वाफ घेताना भाजण्याचा धोका टाळण्यासाठी खूप गरम पाण्यापासून अंतर ठेवा.

**आल्याचा चहा किंवा आले-कोमट पाणी**

आल्यामुळे घशातील खवखव आणि अस्वस्थता कमी होण्यास मदत होऊ शकते. आले उकळून त्याचे कोमट पाणी घेऊ शकता.

**मधाचा वापर**

कोमट पाण्यात थोडा मध घेणे घशातील खोकला आणि जळजळ कमी करण्यास मदत करू शकते. एक वर्षाखालील मुलांना मध देऊ नये.

**मीठाच्या कोमट पाण्याच्या गुळण्या**

यामुळे घशातील कफ आणि खवखव कमी होण्यास मदत होऊ शकते. दिवसातून २-३ वेळा गुळण्या करता येतात.

**झोपताना डोके थोडे उंच ठेवा**

उशी थोडी उंच ठेवून झोपल्यास कफ साचल्यामुळे होणारा त्रास काही प्रमाणात कमी होऊ शकतो.

**पुरेशी विश्रांती घ्या**

सर्दी किंवा श्वसनमार्गाच्या संसर्गामुळे कफ तयार झाला असल्यास शरीराला पुरेशी विश्रांती देणेही महत्त्वाचे आहे.

**धूर आणि धूम्रपानापासून दूर राहा**

सिगारेटचा धूर, धूळ, अगरबत्तीचा धूर किंवा तीव्र परफ्यूम यामुळे श्वसनमार्गाची जळजळ वाढून कफाचा त्रास वाढू शकतो.

**डॉक्टरांकडे कधी जावे?**

कफ काही दिवसांपेक्षा जास्त काळ टिकत असेल, वारंवार होत असेल किंवा त्यासोबत श्वास लागणे, घरघर, छातीत दुखणे, जास्त ताप, ऑक्सिजन कमी होणे किंवा रक्त येणे अशी लक्षणे असतील तर घरगुती उपायांवर अवलंबून न राहता वैद्यकीय तपासणी करून घ्या.




**मेष** - आपणास प्रसंगानुरूप वागावे लागेल. कुणावरही दबाव टाकू नका.

**वृषभ** - महत्त्वाच्या कामात यश मिळेल. कोर्टाच्या कामात प्रगती होईल.

**मिथुन** – आर्थिक निर्णय जपून घ्यावेत. तुमच्या कामात इतरांची मदत मिळेल.

**कर्क** - वडील माणसांची काळजी घ्यावी लागेल. त्यांच्या मतांचा अनादर करू नका. प्रयत्नाने यश मिळवता येईल. गोड बोला.

**सिंह** – घरातील एखादा महत्त्वाचा प्रश्न सोडवताना सर्वांच्या मतांचा विचार करावा.

**कन्या** – तुमचा विचार पटवून देण्यासाठी युक्तीने बोला. प्रतिष्ठा वाढेल. अनुभवी व्यक्तीचा सल्ला घ्या.

**तूळ** - मोठी आर्थिक उलाढाल करू शकाल. आजारांकडे दुर्लक्ष करू नये, सहकाऱ्यांचे सहकार्य लाभेल.

**वृश्चिक** – उद्योगात यश मिळेल. आपल्या जवळच्या व्यक्तीशी प्रेमाने बोला. मोठी आर्थिक गुंतवणूक विचारपूर्वक करावी.

**धनु** – विचारांना चालना देणारी घटना घडेल. थकबाकी वसूल करा. मान-प्रतिष्ठा वाढवणारी घटना घडेल.

**मकर** - कठीण काम करून घेता येईल. आर्थिक बाजू सावरता येईल. प्रतिष्ठा शाबूत ठेवता येईल.

**कुंभ** – तुमच्या सकारात्मक विचारांना सर्वांची साथ मिळेल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

**मीन** – नोकरीत वरिष्ठांच्या मर्जीनुसार काम करावे लागेल.

# Two Sisters From Bihar's Nalanda Break Glass Ceiling To Make A Mark As National Rugby Players



**Nalanda :** Two sisters from Raghu Bigha village in Nalanda faced taunts as they played rugby. People mocked them for wearing shorts. But Dharmendra Sao, father of Komal Kumari and Priyanshu Kumari, who works as a daily wage labourer, didn't pay any heed to how people responded and encouraged the girls to follow their passion. Years of hard work have helped the two sisters make a name for themselves in national-level rugby.

"People used to taunt me for wearing shorts, and I was mocked for coming home at night," said Komal, 17, about the struggle that she faced in pursuing the sport. Not only Komal; her sister, Priyanshu, is now a successful national-level rugby player.

Family members of the sisters said that the villagers questioned them for allowing girls to play the sport. However, Sao said he worked hard as a daily wage labourer while his wife, Pinki Devi, did sewing, to ensure that the girls could continue to play the game. The family comprises three daughters and one son, and all three daughters play rugby.

Despite a limited income, Sao said he never stopped his daughters from playing. "People used to say it wasn't right for daughters to play sports, asking us what they would achieve by doing so. I would reply to them that even if nothing happens, at least they would make a name for themselves. I used whatever little I earned from my labour to ensure that the girls could play," said Sao.

"Today, my daughters play rugby at the national level alongside junior players. My family takes pride in this. I haven't actually seen my daughters play on the field yet, but both of them have won gold medals for Bihar. My only dream is to fulfil their dreams," he added.

Komal, a Class 12 student, began playing rugby in November 2023 and prior to that she had participated in Kho Kho too. It was her school's physical education teacher who encouraged her to take up rugby. Initially, Komal was apprehensive about tackles and injuries, but consistent practice boosted her confidence.

Komal won a gold medal in the Under-17 category at the 68th National School Games in Patna in 2024. Subsequently, she secured gold medals at the 2025 Gwalior Open Games and the Junior National Rugby 7s in Assam. She further proved her talent by winning gold in the Under-15 category in Odisha (2026), silver medals in the Asmita Rugby League and the 69th National School Games, and a bronze medal in the Under-18 category at the Hyderabad Junior National Rugby Championship.

"I have won gold multiple times at the National Games in junior-level rugby. Initially, I was afraid to play, but once we started, I enjoyed it. We didn't look back and are now competing at the national level. In the beginning, people in our neighbourhood used to mock my father, but my parents, grandfather, and the entire family supported us," said Komal.

Inspired by her elder sister, the younger one, Priyanshu, a 9th-grade student, also became a rugby player. Watching her elder sister and other seniors practice on the field inspired Priyanshu to make rugby her dream as well. Initially, she too was sceptical, but after about six months of hard work, she became confident about the game. Priyanshu demonstrated her talent early on by winning a gold medal at the 68th National School Games in 2024. She also won a gold medal in the Under-15 category at the 10th Sub-Junior National Rugby 7s Championship held in Odisha in 2025. Subsequently, she secured a silver medal at the Asmita National Rugby tournament and another silver at the Junior National Rugby School Games in Odisha in 2026.

"I won gold in my very first game. I have won two gold medals and one bronze medal. My dream is to play for India. I want to see myself in the India jersey," said Priyanshu Kumari, the junior national rugby player.

Following their success at the national level, the sisters now dream of representing India on the international stage.

# Kapil Dev Questions India's Missed Chance After Sri Lanka Draw

**Hyderabad :** Former India captain Kapil Dev has questioned India's inability to force a result in the second Test against Sri Lanka, saying a team that enforces the follow-on should ideally finish the job.



"If you give the follow-on, you should win the match," Kapil said while speaking at a private programme here on Saturday, reflecting on India's drawn second Test in Colombo which concluded on Thursday.

Kapil, however, acknowledged that India played good cricket but felt the team needed to raise its level further, particularly with the World Test Championship (WTC) points at stake.

"To stay on top of the World Test Championship table, we have to win every match," he said, stressing the importance of converting dominant positions into victories.

India had appeared firmly in control after declaring at 503/9 and bowling Sri Lanka out for 290, securing a first-innings lead of 213 runs. Captain Shubman Gill then enforced the follow-on, hoping his bowlers could complete a series sweep.

But Sri Lanka produced a remarkable resistance in their second innings, finishing on 429/9 in 154 overs to secure a draw. Sonal Dinusha was at the heart of the fightback, remaining unbeaten on 133 and batting deep into the final day.

The draw meant India won the two-Test series 1-0, having already defeated Sri Lanka by 165 runs in the opening Test at Galle. But the missed opportunity in Colombo cost India valuable WTC points, leaving the team fifth in the standings with a points percentage of 51.52.And one Sri Lankan batsman emerged as the defining figure of the series.

**Dinusha — India's Unlikely Nemesis**

Sonal Dinusha produced an extraordinary sequence of innings against India. He scored 100 and 84 in the two innings of the first Test at Galle, followed by 103 in Sri Lanka's first innings in Colombo and an unbeaten 133 in the second innings. That gives him 420 runs in four innings, including three centuries, against India in the series.

His unbeaten 133 in the second innings was particularly significant. Sri Lanka were forced to follow on and were still fighting for survival, but Dinusha, supported by the lower order, frustrated India's bowlers for session after session.

India's inability to claim the final wickets despite having reduced Sri Lanka to 229/6 ultimately turned what looked like a straightforward victory into one of the most remarkable draws of the series.

# Isle of Man Cricketer Breaks 94-Year-old Record

**Hyderabad :** Joanne Hicks has scripted history at the age of 51 in international cricket. He became the oldest cricketer, male or female, to take a five-wicket haul in an international fixture. She achieved the unique record while playing for Isle of Man against Greece in the Women's Continental Cup in Romania. She clocked bowling figures of 5/10 from her four overs to lead the team to a nine-wicket win.

Hicks took a five-wicket haul at the age of 51 years and 171 days and became the first bowler to claim a five-for after turning 50. Hicks picked the wickets of Lydia Katsimari, Sofia-Nefeli



Georgota, Aggeliki-Ioanna Argyropoulou, Theodora Parisi-Mesimeri and Alekcandra Kourkoulou. Four out of the five wickets came either via bowled or LBW.

Thanks to her spell, Isle of Man bundled out Greece for just 52 in 15 overs. Argyropoulou was the highest scorer for Greece with 17 runs. Georgina Ford supported Hicks, taking two wickets for nine runs. Isle of Man completed the chase in just six overs. Libby Moore remained unbeaten on 24 while Grace Cottier amassed 19 runs. Hicks was adjudged Player of the Match.


**Hicks break 94-year-old record**

With the performance, she broke a record that stood since 1932. Australia's Bert Ironmonger was the oldest bowler to take a five-wicket haul in international cricket earlier. The left-arm spinner achieved the feat against South Africa in 1932 at 49 years and 314 days.

Ironmonger took 5/6 and 6/18 in the Test and played knocks of 36 and 45. His contribution played a key role in Australia winning the match by an innings and 72 runs.

# India Ships Petrol to Russia Amid Deepening Fuel Supply Crunch

**New Delhi :** India has emerged as a key supplier of gasoline (petrol) to Russia amid a surge in Russian fuel imports triggered by Ukrainian drone attacks on refineries, ship tracking data showed.




Russia's seaborne gasoline imports surged to a record around 125,000 barrels per day (kbd) in August, equivalent to a projected 470,000 tonnes for the month, as repeated attacks on its refineries disrupted domestic fuel production, according to energy analytics firm Vortexa.

Indian refiners supplied as much as 1 million barrels of gasoline in the last two months, trade sources said. The supplies essentially came from Vadinar refinery in Gujarat, operated by Nayara Energy, which is half-owned by Russia's Rosneft. Since 2022, India has pivoted towards Russia to meet a bulk of its crude oil -- raw material for making fuels like petrol and diesel.

India's purchases of Russian crude oil hit a record high as the conflict in the Gulf squeezes supply from other sources. India imported more than 2.6 million barrels per day of Russian crude in June and July, up from a low of 1 million bpd in February and accounting for more than half of the country's crude imports.

It's likely that fuel exported to Russia may have been made from Russian crude.

Russia, one of the largest crude exporters, has to import gasoline after Ukrainian drone attacks on its energy infrastructure led to up to a 70 per cent drop in domestic production. This has triggered a fuel supply crunch that has forced Moscow to import petroleum products while continuing to impose restrictions on fuel sales across the country.

India, Turkey, and Morocco supplied gasoline to Russia in August, as Moscow grappled with a growing mismatch between domestic fuel supply and demand.

Russia in July extended its full export ban on gasoline for both producers and non-producers through the end of January 2027. Its diesel export ban was extended through September 1, 2026. Around 55 per cent, or about 260,000 tonnes, of Russia's imported gasoline in August arrived on sanctioned tonnage, Vortexa said.

"All India-origin gasoline cargoes Russia imported in August were carried on sanctioned fleets and involved dark ship-to-ship (STS) transfers in the Mediterranean," it said.

Overall, around 40 per cent of Russia's August gasoline imports moved via ship-to-ship transfers, with the majority conducted in the dark, with vessels switching off their automatic identification system (AIS) signals.

While gasoline imports have surged, Russian diesel exports remain severely constrained by the export ban, refinery damage and disruptions at fuel terminals. Vortexa said 32 attacks were carried out on Russian refineries during July and August, roughly one every other day.

# Sitharaman Meets US Business Leaders, Invites Investment in India

**Washington :** Finance Minister Nirmala Sitharaman met business leaders in the US in sectors ranging from agriculture to artificial intelligence and invited them to explore opportunities in India as a hub for global operations.



Sitharaman met Brandon Tseng, co-founder and president of Shield AI; Mark S Hoplamazian, president and CEO of Hyatt; and Luca Zaramella, executive vice president and COO of Mondelez International, in Chicago on Friday.

The finance minister also met Monish Patolawala, executive vice president and CFO of Archer Daniels Midland (ADM); and Sachin Lawande, president and CEO of Visteon Corporation.

The discussions with Tseng focused on Shield AI's engagement with India and opportunities to deepen cooperation in AI-enabled autonomy, unmanned systems and next-generation defence technologies, including R&D, technology development, co-development and co-production.

The discussions with Patolawala covered ADM's long-standing commitment to India and significant opportunities to deepen its engagement across agriculture, food, nutrition, technology and sustainable value chains.

Sitharaman welcomed ADM's investments in India, including its growing farmer partnerships, engagement with Farmer Producer Organisations and establishment of its global technology and AI capabilities in Bengaluru.

The discussions also covered opportunities for India to serve as a global hub for ADM's operations, including exports, technology and treasury functions, with GIFT IFSC offering potential opportunities for international financial and treasury operations.

The discussions with Lawande covered Visteon's strong confidence in India's growth prospects and its expanding role as a key market and technology hub for the company.

The discussions with Hoplamazian covered Hyatt's continued commitment to India and opportunities to further expand its presence as the country's tourism and hospitality sector enters a new phase of growth. Sitharaman highlighted India's improving connectivity and infrastructure, which is opening up new tourism and commercial destinations, with tier-II and tier-III cities emerging as important centres of economic activity and travel.

The finance minister suggested exploring opportunities for talent development through the National Institute of Hospitality and GIFT City as a potential financing and treasury hub for Hyatt's growing India operations.

The discussions with Zaramella covered Mondelez International's strong and growing presence in India, continued investments in manufacturing and infrastructure, and opportunities to further expand its production, sourcing, services and export footprint.

# ‘बाल्यावस्थेतील प्रारंभिक विकास’ विषयावरील कार्यशाळेचे मुख्य सचिव राजेशकुमार अग्रवाल यांच्या हस्ते उद्‌घाटन संपन्न

● पुणे, अभिजित येरल्लू :

बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्ययोजना तयार करण्यासाठी यशदा येथे ‘बाल्यावस्थेतील प्रारंभिक विकास’ या विषयावर आयोजित कार्यशाळेचे उद्घाटन मुख्य सचिव राजेशकुमार अग्रवाल यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी, सार्वजनिक आरोग्य विभागाचे प्रधान सचिव डॉ. निपुण विनायक, मेघालय राज्याचे प्रधान सचिव संपतकुमार, आदिवासी विभागाचे सचिव विजय वाघमारे, ग्रामविकास सचिव डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार, यशदाचे महासंचालक डॉ. सुहास दिवसे यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, तज्ज्ञ डॉक्टर उपस्थित होते.

कार्यशाळेची भूमिका स्पष्ट करताना मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव डॉ. श्रीकर परदेशी म्हणाले, बाल्यावस्थेतील प्रारंभिक विकास हा विषय योग्य पद्धतीने हाताळल्यास भविष्यातील अनेक सामाजिक विकासाची उद्दिष्टे साध्य करता येऊ शकतात. त्यामुळे या विषयाकडे केवळ एका विभागाचा विषय म्हणून न पाहता विविध विभागांनी एकत्रितपणे विचार करून कृती करण्याची आवश्यकता आहे.

बालकाच्या आयुष्यातील पहिली हजार दिवस अत्यंत महत्त्वाची असतात. गर्भधारणेपासून जन्मानंतरच्या पहिल्या दोन वर्षांपर्यंतचा हा कालावधी विशेषतः मेंदूच्या विकासासाठी निर्णायक असतो. या काळात शासन, समाज आणि पालकांकडून होणारे सकारात्मक हस्तक्षेप जितके परिणामकारक असतील, तितका त्याचा लाभ बालकाला पुढील आयुष्यात मिळतो. विकासाच्या योग्य टप्प्यावर आवश्यक बाबी साध्य झाल्या नाहीत, तर त्याचे परिणाम पुढील संपूर्ण आयुष्यावर होऊ शकतात. त्यामुळे बालकाच्या विकासाच्या सुरुवातीच्या टप्प्यातच योग्य हस्तक्षेप करणे आवश्यक आहे. एकदा बालकाचे वय पुढे गेले की, त्या वयात साध्य करावयाच्या विकासाच्या संधी त्याच स्वरूपात पुन्हा उपलब्ध होत नाहीत, असे डॉ. परदेशी यांनी स्पष्ट केले.

## बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध विभागांचे समन्वयाने काम

राष्ट्रीय कुटुंब आरोग्य सर्वेक्षणाचा संदर्भ देताना ते म्हणाले, महाराष्ट्रात बालकांमधील वाढ खुंटण्याचे प्रमाण कमी करण्याच्या दिशेने चांगली प्रगती झाली आहे. सर्वेक्षणाच्या तिसऱ्या टप्प्यात हे प्रमाण सुमारे ४६ टक्के होते. त्यानंतरच्या काळात त्यात लक्षणीय घट झाली असून अलीकडील सर्वेक्षणानुसार हे प्रमाण सुमारे २९.५ टक्क्यांपर्यंत आले आहे. महाराष्ट्र हे देशाच्या आर्थिक विकासाचे इंजिन म्हणून ओळखले जाते. त्याचप्रमाणे सामाजिक विकासाच्या निर्देशांकांमध्येही राज्याने अधिक वेगाने प्रगती करणे आवश्यक असून, लहान मुलांच्या वयानुसार उंची आणि वाढीमध्ये अपेक्षित सुधारणा करण्यासाठी अधिक प्रभावी प्रयत्नांची गरज आहे.

बाल्यावस्थेतील प्रारंभिक विकासाचा परिणाम केवळ बालकाच्या आरोग्यापुरता मर्यादित नसून त्याचा थेट संबंध पोषण, पूर्वप्राथमिक शिक्षण, शालेय कामगिरी, भविष्यातील उत्पादकता आणि मानवी भांडवल निर्मितीशी आहे. बालकाला योग्य पोषण मिळाल्यास आरोग्य चांगले राहते; चांगल्या आरोग्यामुळे शाळेतील उपस्थिती आणि शिकण्याची क्षमता सुधारते. शालेय कामगिरी चांगली झाल्यास भविष्यातील उत्पादकता वाढते आणि त्यातून चांगले जीवनमान साध्य होण्यास मदत होते. त्यामुळे प्रारंभिक बालविकासासाठी केलेले प्रयत्न हे भविष्यातील सक्षम समाज आणि सक्षम मनुष्यबळ निर्मितीसाठी महत्त्वपूर्ण ठरतात, असे डॉ. परदेशी यांनी सांगितले.

प्रारंभिक बालविकासाचा संबंध शाश्वत विकास उद्दिष्टांमधील अनेक उद्दिष्टांशी संबंधित आहे. शून्य उपासमार, उत्तम आरोग्य, गुणवत्तापूर्ण शिक्षण, लैंगिक समानता, गरिबी निर्मूलन, सन्मानजनक रोजगार आणि आर्थिक विकास यांसारख्या विविध क्षेत्रांवर प्रारंभिक बालविकासाचा सकारात्मक परिणाम होतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली २३ जुलै रोजी शाश्वत विकास उद्दिष्टांबाबत कृती कक्षाची बैठक झाली होती. यात सविस्तर चर्चा झाली. राज्य ज्या क्षेत्रात मागे आहे, त्या क्षेत्रापासून सुधारणा करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली होती. प्रारंभिक बालविकास हा एकाच वेळी अनेक शाश्वत विकास उद्दिष्टांवर परिणाम करणारा विषय असल्याचे डॉ. परदेशी यांनी सांगितले.

बालकांच्या प्रारंभिक विकासासाठी आरोग्य, महिला व बाल विकास, शिक्षण, आदिवासी विकास, नागरी विकास, पाणी व स्वच्छता यांसह विविध विभागांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. त्यामुळे विविध विभागांनी एकत्रितपणे काम करून योजनांचा प्रभावी समन्वय आणि अभिसरण साधणे आवश्यक आहे. त्यासाठी आयोजित कार्यशाळेचा उद्देश नवीन योजना किंवा नवीन उपक्रम सुरू करणे नसून, सध्या सुरू असलेल्या योजनांमध्ये असलेल्या त्रुटी किंवा तफावत दूर करणे, चांगल्या पद्धतीने सुरू असलेल्या उपक्रमांचा अधिक वेगाने आणि व्यापक स्वरूपात विस्तार करणे तसेच त्यांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी आवश्यक उपाययोजनांवर विचारमंथन करणे हा आहे, असे डॉ. परदेशी यांनी नमूद केले.

# कोकणच्या चाकरमान्यांसाठी खुशखबर! ९ आणि ११ सप्टेंबरला धावणार 'मोदी एक्स्प्रेस'

● मुंबई, विशाल कारंडे :

गणेशोत्सवानिमित्त मुंबईतून कोकणात जाणाऱ्या चाकरमान्यांसाठी मंत्री नितेश राणे यांची ९ आणि ११ सप्टेंबरला 'मोदी एक्स्प्रेस' धावणार आहे. १४ वर्षांपासून गेल्या गणेशोत्सवाच्या काळात चाकरमान्यांना गावाकडे घेऊन जाणाऱ्या या विशेष रेल्वेची या वर्षीची तयारी पूर्ण झाली आहे. ९ आणि ११ सप्टेंबरला दादर येथील प्लॅटफॉर्म क्रमांक १४ वरून सकाळी १०.३० वाजता 'मोदी एक्स्प्रेस' कोकणाच्या दिशेने रवाना होणार असल्याची घोषणा मत्स्यव्यवसाय व बंदरे विकास मंत्री तथा सिंधुदुर्गचे पालकमंत्री नितेश राणे यांनी केली.



गणेशोत्सवासाठी गावाकडे जाणाऱ्या चाकरमान्यांना प्रवासात खाण्यापिण्याची इतर सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील. बुकिंगसाठी २ ते ५ सप्टेंबर या कालावधीत संबंधित भाजप मंडल अध्यक्ष यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन राणे यांनी केले. कणकवली-देवगड-वैभववाडी मतदारसंघातील चाकरमान्यांनी भाजप मंडलाध्यक्षांशी तर रत्नागिरी प्रवाशांनी भाजप जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव यांच्याशी संपर्क साधावा, असे त्यांनी सांगितले.

**चाकरमान्यांची हक्काची गाडी !**

गेल्या १४ वर्षांपासून गणेशोत्सवाच्या निमित्ताने 'मोदी एक्स्प्रेस'च्या माध्यमातून चाकरमान्यांना गावाकडे घेऊन जात आहोत. दरवर्षी प्रवाशांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान पाहून मनापासून समाधान वाटते. यंदाही नाचत-गाजत आपल्या गावाकडे जाण्यासाठी 'मोदी एक्स्प्रेस' सज्ज आहे. आपली हक्काची मोदी एक्स्प्रेस पकडा आणि गणपती बाप्पाच्या स्वागतासाठी गावाकडे जाऊ या, असे आवाहनही मंत्री राणे यांनी केले आहे.

# थेट धान्य वाहतूक बंद करा; हमाल माथाडींचा राज्य सरकारला इशारा

● मुंबई, राकेश गायकवाड :

राज्यातील पाचशेहून अधिक शासकीय धान्य गोदामांमधील धान्याची थेट वाहतूक करण्याचा निर्णय मागे घेण्याचे आश्वासन राज्य सरकारने न पाळल्यामुळे सप्टेंबर महिन्यात पुन्हा राज्यव्यापी आंदोलन करण्याचा इशारा शासकीय धान्य गोदाम हमाल माथाडी संघटनांच्या संयुक्त कृती समितीने दिला आहे. या आंदोलनाची दिशा, स्वरूप आणि पुढील रणनीती निश्चित करण्यासाठी सोमवारी सकाळी ११.३० वाजता हमाल भवन, पुणे येथे संयुक्त कृती समितीची बैठक आयोजित करण्यात आली आहे.



शासकीय धान्य गोदामांमधील हमाल माथाडी यांच्या रोजगाराचा प्रश्न अनेक दिवसांपासून प्रलंबित आहे. या आधी संयुक्त कृती समितीच्या माध्यमातून २५ व २६ मे रोजी राज्यभर कामबंद आंदोलन करून जिल्हाधिकारी कार्यालयांसमोर धरणे धरण्यात आले होते. याची दखल घेत अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षणमंत्री छगन भुजबळ यांनी २६ मे रोजी गोदाम हमाल माथाडी यांना बेरोजगार होऊ दिले जाणार नाही तसेच मंडळाच्या निश्चित दरानुसार हमालांना मजुरी देण्यात येईल, असे आश्वासन दिले होते. त्याची अंमलबजावणी कधी होईल, असा सवाल त्यांनी केला.

**तातडीने निर्णय घ्या!**

थेट वाहतूक धोरण विश्वासार्ह नसून शासनाचा स्वतःच्या यंत्रणेवरच अविश्वास दाखवणारे हे धोरण आहे तसेच यामुळे राज्यभरातील १० हजारांहून अधिक हमाली करणाऱ्या माथाडींचा रोजगार हिरावला जाणार जाणार आहे. त्यामुळे शासकीय गोदामांमधील थेट धान्य वाहतूक थांबवून पूर्वीची रोजगाराभिमुख व्यवस्था कायम ठेवावी वा या व्यवस्थेमुळे हमालांचे काम कमी होत असेल तर संबंधित वाहतूक कंत्राटदाराने त्याच गोदामातील नोंदीत माथाडींकडूनच हमालीचे काम करून घ्यावे आणि माथाडी मंडळाने निश्चित केलेल्या दरानुसार मजुरी व लेव्ही भरण्याचे बंधन कंत्राटदारावर घालावे, अशी मागणी धान्य गोदाम हमाल माथाडी संघटनांच्या संयुक्त कृती समितीने केली आहे.


# मंगला एक्स्प्रेसमध्ये विद्यार्थ्यांना विषबाधेचा संशय


## २५ ते ३० जणांची प्रकृती बिघडली

● जळगाव, दिगंबर जाधव :

दिल्लीहून त्रिचूर येथे शैक्षणिक सहलीसाठी निघालेल्या काही विद्यार्थ्यांनी भोपाळ रेल्वे स्थानकावर जेवण घेतल्यानंतर २५ ते ३० जणांची प्रकृती बिघडली. यातील ५ ते ६ विद्यार्थ्यांची प्रकृती गंभीर आहे. त्यांच्यासोबत डॉक्टरांचे पथक सोबत दिले आहे.

ही घटना रेल्वे प्रशासनास कळताच रेल्वे प्रशासनाने भुसावळ स्थानकावर वैदयकीय पथक तैनात करत त्यांना






वैदयकीय उपचार व आवश्यक ती औषधे दिली जेवणातून विषबाधा झाली असण्याचा संशय व्यक्त केला आहे. दिल्लीहून त्रिचूर येथे शैक्षणि सहलीसाठी एकूण ९३ विद्यार्थी व १२ शिक्षक मंगला एक्स्प्रेसने निघाले आहेत. यातील २५ ते ३० विद्यार्थ्यांनी भोपाळ रेल्वे स्टेशनवर जेवण घेतले. त्यांना उलटी व मळमळचा त्रास सुरू झाला.

# कोयनेत ९८.५६ टक्के पाणीसाठा; वीजनिर्मितीसाठी पायथा वीजगृह सुरू

● सातारा, सचिन कदम :

महाराष्ट्राची ऊर्जादायिनी मानल्या जाणाऱ्या कोयना धरण पाणलोट क्षेत्रात यंदा पावसाची ‘दिवसा ओढ आणि रात्री झोड’ अशी वैशिष्ट्यपूर्ण तऱ्हा पाहायला मिळत आहे. नैसर्गिक अनिश्चितता आणि सुरुवातीचा ‘एल निनो’चा प्रभाव लक्षात घेता, प्रशासनाने अत्यंत सावधगिरी बाळगत धरणातील विसर्ग नियंत्रित केला आहे. १०५.२५ टीएमसी क्षमता असलेल्या कोयना जलाशयात



सद्यस्थितीत १०३.७३ टीएमसी म्हणजेच सुमारे ९८.५६ टक्के उपयुक्त जलसाठा झाला आहे. धरण पूर्ण क्षमतेने भरून घेण्याचे नियोजन असल्याने मुख्य दरवाजे बंद ठेवण्यात आले असले, तरी नदी पात्रातील पाण्याचा समतोल राखण्यासाठी व ऊर्जानिर्मितीसाठी पायथा वीजगृहाचे एक केंद्र सुरू करून १,०५० क्युसेक विसर्ग सुरू करण्यात आला आहे.

धरण व्यवस्थापनाचे उपविभागीय अभियंता किरण कानुगडे याबाबत बोलताना म्हणाले, की वरिष्ठांच्या मार्गदर्शनानुसार आवक आणि पावसाचा अचूक अंदाज घेऊन पाण्याचा प्रत्येक थेंब साठवण्याला प्राधान्य दिले जात आहे. कोयना धरण क्षमतेने भरून घेण्याला आता प्राधान्य असून, वीज निर्मितीतही मागणीनुसार वाढ केली जाईल.

यंदाच्या हंगामात कोयना क्षेत्रात आतापर्यंत ४,७९५.६६ मिमी पावसाची नोंद झाली असून, हे प्रमाण वार्षिक सरासरीच्या ९५.९१ टक्के इतके आहे. विशेष म्हणजे गतवर्षी याच काळात ४,७७० मिमी (९५.७८ टक्के) पावसाची नोंद झाली होती. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा पावसात झालेली अल्पशी वाढ आणि सद्या सुरू असलेली १३,३७४ क्युसेक वेगाची जलआवक यामुळे शिवसागर जलाशय पूर्ण भरण्याच्या मार्गावर आहे. पाणलोटातील ही समाधानकारक आवक आगामी काळातील जलसुरक्षेची मोठी हमी मानली जात आहे.

# हिंगात प्रमाणापेक्षा जास्त स्टार्च; एव्हरेस्ट, लालजीच्या हिंग पावडरवर बंदी

● नवी दिल्ली, प्रगती शर्मा :

भारतीय अन्न सुरक्षा आणि मानक प्राधिकरणाने प्रसिद्ध 'एव्हरेस्ट फूड प्रॉडक्ट्स' आणि 'लालजी गोधू अँड कंपनी'च्या 'हिंग पावडर'च्या विक्रीवर बंदी घातली आहे. प्रयोगशाळेतील तपासणीत या कंपन्यांचा हिंग निकृष्ट दर्जाचा आणि अन्न सुरक्षा मानकांचे उल्लंघन करणारा असल्याचे स्पष्ट झाले आहे.प्राधिकरणाने सोशल




मीडियाद्वारे या कारवाईची अधिकृत माहिती दिली आहे. प्राथमिक प्रयोगशाळेतील अन्न विश्लेषकांच्या तपासणी अहवालानुसार एव्हरेस्टच्या कंपाऊंडेड हिंग पावडरचे नमुने 'चुकीचे लेबलिंग आणि निकृष्ट दर्जाचे' आढळून आले आहेत.

'लालजी गोधू अँड कंपनी'चे कंपाऊंडेड हिंग पावडर आणि वडीचे नमुनेही निकृष्ट, भेसळयुक्त आणि विहित निकषांचे उल्लंघन करणारे आढळले आहेत. हिंग तयार करण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कच्च्या हिंगामध्ये प्रमाणापेक्षा जास्त स्टार्चचे प्रमाण आढळले आहे. नियमानुसार हिंगात वजनाच्या १ टक्क्यापेक्षा जास्त स्टार्च असण्यास मनाई आहे.

प्राधिकरणाने दोन्ही कंपन्यांना निकृष्ट दर्जाच्या हिंगाची विक्री रोखण्यासाठी आणि एफएसएस कायदा, २००६ नुसार मानकांचे पालन करणारी उत्पादनेच तयार करून विक्रीसाठी उपलब्ध करण्यासाठी तत्काळ 'कृती आराखडा' सादर करण्याचे आदेश दिले आयाहेत. जर कंपन्यांनी या त्रुटी लवकरात लवकर दूर केल्या नाहीत, तर त्यांच्यावर अधिक कठोर कायदेशीर कारवाई केली जाईल, असा इशाराही प्राधिकरणाने दिला आहे.

# भात पिकावर करपा-अळीचे संकट; ड्रोन फवारणीने शेतकऱ्यांना दिलासा

● कराड, नितीन देवळेकर :

सध्याच्या प्रतिकूल हवामानामुळे भात पिकावर कडा करपा आणि पानावरील अळीचा प्रादुर्भाव वाढल्याने शेतकरी चिंताग्रस्त झाले आहेत. अशा काळात संभाव्य नुकसान टाळण्यासाठी तालुक्यातील कोपर्डे हवेली व लगतच्या परिसरातील प्रगतशील शेतकऱ्यांनी ड्रोन तंत्रज्ञानाचा



आधार घेतला आहे. पारंपरिक पद्धतीपेक्षा अत्यंत वेगाने आणि प्रभावीपणे कीटकनाशकांसह शक्तिवर्धक औषधांची फवारणी केली जात आहे. यामुळे केवळ वेळेचीच नव्हे, तर औषधे, मजूर आणि पैशांची मोठी बचत होत आहे.‘एल निनो’ची धास्ती संपली तरी बाजारातील दरांचा चढउतार आणि शेतमालाला योग्य भाव न मिळण्याची अनिश्चितता शेतकऱ्यांची पाठ सोडत नाही. यातच रोगांच्या प्रादुर्भावाने पिकांचे होणारे नुकसान शेती परवडणारी उरू देत नाही. या दुहेरी संकटात पिके वाचवणे हे शेतकऱ्यांसमोर मोठे आव्हान असते. आणि अशावेळी ड्रोन संकटमोहक ठरतो आहे.पारंपरिक पंपाच्या तुलनेत ड्रोनमुळे कमी वेळेत जास्त क्षेत्रावर फवारणी होते. शेतात न उतरल्याने जमिनीचा तुडवा थांबतो व पिकांचे नुकसान टळते. हवेच्या दाबाने औषध पानापानांवर योग्य प्रमाणात पोहोचून औषध वाया जात नाही. यामुळे मजुरी आणि औषधांच्या खर्चात मोठी काटकसर होते. पावसाची उघडीप आणि अचानक पडणारे ऊन भात पिकासाठी घातक ठरत आहे.